रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २३७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, १६ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## मुख्यमंत्री फडणवीसांना महात्मा फुले विद्यापीठाकडून 'डॉक्टरेट'




**राहुरी** : येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ३९वा पदवीदान समारंभ रविवारी (दि.१५) झाला. या समारंभास राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषीमंत्री दत्ता भरणे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांना विद्यापीठाकडून डॉक्टर ऑफ सायन्स पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते ही पदवी मुख्यमंत्र्यांना प्रदान करण्यात आली. यावेळी ते म्हणाले की, मला डॉक्टर ऑफ सायन्स पदवी प्रदान केल्याबद्दल कुलपती, कुलगुरूंचे मनापासून आभार. जेव्हा याबाबत मला विचारणा झाली, तेव्हा पदवी घ्यावी की नाही असा प्रश्न होता, कारण कृषी क्षेत्रात अजून खूप काम करायचे आहे, परंतु महात्मा फुले कृषी विद्यापीठ नावाजलेले आहे. त्यामुळे पदवीसाठी नाही म्हणू शकलो नाही.

ड्रायव्हर पाहिजे
फॉर्च्युनर कार साठी ड्रायव्हर पाहिजे
१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२,
शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल,
जिल्हा-रायगड (महाराष्ट्र)
माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई- ४१०२०६
संपर्क
मोबाईल : ८९०८४००२१४
Email : ekanathpatil4141@gmail.com

# पाच राज्यात विधानसभा निवडणूक

## प. बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम, पुद्दुचेरीचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम तसेच पुद्दुचेरी (केंद्रशासित प्रदेश)मधील विधानसभा निवडणुकीची घोषणा रविवारी (दि. १५) केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. आसाम, केरळम, पुद्दुचेरी येथे ९ एप्रिल रोजी; तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल; तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांमध्ये मतदान होणार असून पाचही राज्यांमधील मतमोजणी ४ मे रोजी होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### पश्चिम बंगाल (जागा २९४)



पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात (१५२ जागा) ३० मार्चला अधिसूचना येईल, ६ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील आणि २३ एप्रिलला मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात (१४२ जागा) २ एप्रिलला अधिसूचना निघेल, ९ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील आणि २९ एप्रिलला मतदान होईल. दोन्ही टप्प्यांसाठी अर्जांची छाननी अनुक्रमे ७ आणि १० एप्रिलला होईल, तर निकाल ४ मे रोजी एकत्रितपणे लागेल.



### आसाम (जागा १२६)



विधानसभा निवडणुकीची अधिसूचना १६ मार्च रोजी जाहीर होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २३ मार्च असून २४ मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. त्यानंतर अर्ज मागे घेण्यासाठी २६ मार्चपर्यंत मुदत असेल.

### केरळम (जागा १४०)



केरळम विधानसभेसाठी निवडणूक प्रक्रिया १६ मार्च रोजी अधिसूचनेने सुरू होईल. नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख २३ मार्च असून छाननी प्रक्रिया २४ मार्च रोजी पार पडेल, तर उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेतून आपले नाव २६ मार्चपर्यंत मागे घेता येणार आहे.

**या निवडणुका म्हणजे केवळ लोकशाहीची प्रक्रिया नसून भारताच्या समृद्ध संस्कृतीचा उत्सव आहे. तो आपल्या देशातील विविधतेतील एकता खऱ्या अर्थाने अधोरेखित करतो. आसाम, केरळम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये १०० वर्षांहून अधिक वयाचे (शतायुषी) आणि ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या लक्षणीय आहे. सर्व मतदान केंद्रांवर १००% वेबकास्टिंग (थेट प्रक्षेपण) करण्याची सोय असेल.**
**-ज्ञानेश कुमार,**
मुख्य निवडणूक आयुक्त

### तामिळनाडू (जागा २३४)



तामिळनाडूमध्ये निवडणूक अधिसूचना ३० मार्च रोजी प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ६ एप्रिलपर्यंत वेळ असेल आणि ७ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल, तर अर्ज मागे घेण्याची मुदत ९ एप्रिलपर्यंत आहे.

### पुद्दुचेरी (जागा ३०)



पुद्दुचेरी केंद्रशासित प्रदेशासाठी १६ मार्च रोजी अधिसूचना निघून २३ मार्चपर्यंत अर्ज दाखल करता येतील. त्यानंतर २४ मार्च रोजी छाननी आणि २६ मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

### १७.४ कोटी मतदार आणि ८२४ मतदारसंघ

यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, पाच राज्यांत एकूण १७.४ कोटी मतदार आणि ८२४ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे २.१९ लाख मतदान केंद्र तयार करण्यात आली असून साधारण २५ लाख कर्मचारी निवडणूक कामात तैनात केले जातील.

### बारामती आणि राहुरीची पोटनिवडणूकही जाहीर

#### २३ एप्रिलला मतदान, ४ मे रोजी निकाल

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी चार राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकीची घोषणा केली. याबरोबरच महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटका, नागालँड, त्रिपुरा या राज्यांतील पोटनिवडणूकदेखील जाहीर केली आहे.
यापैकी गोवा, कर्नाटक, नागालँड, व त्रिपूरा या राज्यातील पोटनिवडणुकीसाठी ९ एप्रिलला, तर महाराष्ट्र व गुजरातमधील पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिलला मतदान होईल. सर्व ठिकाणचा निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर केली आहे. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार याचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यामुळे त्यांचा मतदारसंघ असलेल्या बारामती विधानसभेची जागा रिक्त आहे. त्याचप्रमाणे अहिल्यानगरमधील राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कार्डिले यांचे निधन झाल्याने तिही जागा रिक्त आहे.

# जनतेच्या सोयीसाठी शासन थेट दारी -आमदार प्रशांत ठाकूर

## खारघर येथे महाराजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन पनवेल तालुक्यातील कळंबोली मंडळाच्या वतीने खारघर से. ११ येथील श्री साईबाबा मंदिर परिसरात शनिवारी (दि. १४) करण्यात आले होते. या शिबिरात आदिवासी बांधव व परिसरातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व दाखले थेट उपलब्ध करून देण्यात आले.

या शिबिरास प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, कोकण विभागाच्या अप्पर आयुक्त वैशाली इंदाणी, प्रांत अधिकारी पवन चांडक, तहसीलदार मीनल भोसले-भामरे, भाजप खारघर मंडळ अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, नगरसेविका अनिता पाटील, मिनल पाटील मनाली ठाकूर, दमयंती

### दाखल्यांचे वाटप

भोईर, लीला कातकरी, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, प्रवीण बेरा, संजय घरत, ज्ञानेश्वर खरपुरिया, दीपक ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, खारघर हे नवी मुंबईचे हृदय आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू यामुळे येथील परिसराला एक नवी ओळख मिळाली आहे. त्याचप्रमाणे आता शासन आपल्या दारी आल्यामुळे आपणास कुठेही जाण्याची आवश्यकता राहणार नाही आणि कोणत्याही लाभापासून पात्र नागरिक वंचित राहणार नाहीत.

कोकण विभागाच्या अप्पर आयुक्त वैशाली इंदाणी यांनी आदिवासी बांधवांसाठी तसेच समाजातील प्रत्येक घटकासाठी महसूल विभाग सदैव कार्यतत्पर आहे व जे लागेल ते सहकार्य करण्याची तयारी संपूर्ण महसूल विभागाची असल्याचे सांगितले.

प्रांताधिकारी पवन चांडक यांनी शासनाच्या विविध योजना कशा उपयोगी आहेत व आधुनिक साधनांचा वापर करून त्या योजनांचा लाभ कसा घ्यायचा ते समजावून सांगितले. तहसीलदार मीनल भामरे-भोसले यांनी प्रस्ताविकातून शासन आपल्या दारी आणि समाधान शिबिराच्या माध्यमातून आपण कोणकोणते दाखले आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देत आहोत याची माहिती दिली. **(पान २ वर..)**

## निवडक

### होमुर्झ सामुद्रधुनीसंदर्भात इराणकडून मोठा निर्णय

**तेहरान** : मध्य पूर्वेतील युद्धाच्या भडक्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाणारी होमुर्झची सामुद्रधुनी ठप्प झाली असतानाच इराणने महत्त्वाची भूमिका घेतली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराकची यांनी स्पष्ट केले की, होमुर्झची सामुद्रधुनी जगातील सर्व राष्ट्रांसाठी खुली आहे, केवळ शत्रूंसाठी बंद असेल. इराणच्या या भूमिकेमुळे गेल्या १५ दिवसांपासून समुद्रात अडकून पडलेल्या ७५० जहाजांच्या सुटकेचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### हरीश राणाची लाइफ सपोर्ट सिस्टिम काढली जाणार


**नवी दिल्ली** : हरीश राणा या तरुणाची इच्छामरणाची मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आहे. भारतात इच्छामरणाची मागणी मान्य झालेला हरीश राणा हा पहिला तरुण आहे. १३ वर्षांपासून जिवंतपणी मरण यातना सहन करणाऱ्या हरीशला गाजियाबाद येथील एम्स या ठिकाणी आणण्यात आले आहे. या ठिकाणी त्याला लावण्यात आलेली लाइफ सपोर्ट सिस्टिम हटवली जाईल. या दरम्यान हरीशचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# एक्सप्रेस वेवरील मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात असून १ मेपासून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. त्यामुळे अवघड बोरघाट व नेहमीची वाहतूक कोंडी लवकरच मिटून चालक आणि प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे यांनी या मार्गाची पायभरणी केली होती. बोरघाटातील खोपोली बायपास मार्गापासून सुरू होणारा हा आठ पदरी रस्ता पुणे आणि मुंबई दोन्ही मार्गिकेवर प्रत्येकी चार लेनचा आहे. तो खालापूर तालुक्यातील चावणी गावाच्या हद्दीतून जमिनीच्या पोटातून १५० मीटर खालून खंडाळा व लोणावळा असा थेट सिंहगड महाविद्यालयाच्या जवळ निघणार आहे. यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील अंतर जवळपास आठ किमीने कमीने होऊन २५ मिनिटांची प्रवासात बचत होणार आहे. इंधन बचतीबरोबरच वायू व ध्वनी प्रदूषणही कमी होईल.



### नाविन्यपूर्ण आविष्कार अन् पर्यटकांचे आकर्षण

मिसिंग लिंक केवळ रस्ताच राहणार नसून महाकाय दोन बोगदे, दोन केबल स्डेड पूल तसेच चावणी खोऱ्यातील गर्द झाडी आणि पावसाळ्यातील धबधबे असा निसर्गाने बहरून निघणारा टप्पा प्रवासी व पर्यटकांचे आकर्षण ठरणार आहे. ईपीसी तत्त्वावर बांधण्यात येणारा हा मार्ग देशातील बांधकाम क्षेत्रातील नाविन्यपूर्ण, नवलाईयुक्त बांधकाम असणारा देशातील एक आविष्कार म्हणता येईल. सध्या या मार्गाच्या रंगरंगोटी आणि सफाईचे काम सुरू आहे.

## संसद मकर द्वार येथे राहुल गांधींची चहा पार्टी

# पनवेलमध्ये भाजपचे निषेध आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या अत्यंत संवेदनशील अशा 'मकर द्वार' येथे चहा पार्टी आयोजित केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने रविवारी (दि.१५) पनवेलमध्ये निषेध आंदोलन केले. शहरातील भाजप जनसंपर्क कार्यालय येथे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या विरोधात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.




या आंदोलनामध्ये भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष व पं.स. उपसभापती भूपेंद्र पाटील, कळंबोली अध्यक्ष अमर पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, एकनाथ देशेकर, जि.प. सदस्य कमला देशेकर, नगरसेविका सीता पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, शिवाजी दुर्गे, योगेश लहाने, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, श्रीनंद पटवर्धन, अमित ओझे, प्रवीण मोहोकर, अप्पा भागीत, सतीश मालुसरे, अंकुश पाटील, दिलीप बिष्ट, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, तेजस जाधव, मयूर कदम आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, भारतीय जनता पक्ष संसद व संविधानाला मानणारा पक्ष आहे आणि त्यांचा अपमान आम्ही कधीही सहन करू शकत नाही. संसदेचे मकर द्वार हे अत्यंत महत्त्वाचे स्थान असून त्या ठिकाणी काँग्रेस नेत्यांनी चहा-बिस्किटांची पार्टी करून संसदेची प्रतिष्ठा कमी करण्याचे काम केले आहे. मकर द्वार हे काय पिकनिक स्पॉट आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित करून संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान १२ तारखेला घडलेली ही घटना संपूर्ण देशाची आणि लोकशाहीची बदनामी करणारी असल्याचेही नमूद केले.

# कोकणच्या मातीत कांद्याच्या पातीचे उत्पादन

## महाडमधील कृषी महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**महाड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली (ता.महाड) येथील विद्यार्थ्यांनी रायगडच्या भूमीत कांदा पात उत्पादन पहिल्यांदाच घेतले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६च्या अनुभवात्मक शिक्षण प्रणाली या उपक्रमातर्गत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ही किमया साधली.



कांदा पात उत्पादन घेत असताना रोपसंवर्धन, नांगरट व्यवस्था, सिंचन नियोजन, सेंद्रिय आणि रासायनिक खत व्यवस्थापन, कीड व रोगनियंत्रण तंत्र, तणनियंत्रण पद्धती तसेच उत्पादनाचे संकलन व हाताळणी यांसारख्या कृषी व्यवस्थापनाच्या सर्व टप्प्यांवर काम केले गेले. विद्यार्थ्यांना कामाचे दैनंदिन नियोजन, वेळ व्यवस्थापन, पिकांच्या वाढीवर आधारित निर्णय घेणे, आवश्यक तेथे सुधारणा करणे तसेच एकमेकांशी समन्वय ठेवून टीमवर्क कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रत्येक गटाला स्वतंत्र जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून विद्यार्थी स्वतःच फील्ड रेकॉर्ड, खर्च नोंदी, उत्पादन नोंदी आणि निरीक्षण वह्या अपडेट करत आहेत.

कांदा पात उत्पादनामध्ये भरघोस उत्पन्न मिळावे यासाठी 'भीमा लाल' आणि 'पंचगंगा' हे वाण वापरण्यात आले आहे. उपक्रमाची अंमलबजावणी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हावणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण निरीक्षक प्रा. एन.व्ही. सावंत आणि एन.पी. पवार करत आहेत. विशेष म्हणजे या उपक्रमांतर्गत कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी महाडकरांसाठी ताज्या भाज्यांची उपलब्धता कृषी फार्म ते ग्राहक अशी थेट विक्री केंद्रामार्फत करून देत आहेत.

### प्रेमप्रकरणातून तरुणाची हत्या

**पुणे : प्रतिनिधी**

प्रेमप्रकरणाच्या रागातून एका तरुणाला प्रेयसीच्या घरच्यांनी घरी बोलावून बेदम मारहाण करत हत्या केली. पुण्यातील कोथरूड परिसरात ही थरारक घटना घडली असून या प्रकरणी १० जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

नागेश जाधव (वय २०) असे मयत तरुणाचे नाव असून तो 'ऑफिस बॉय' होता. नागेश आणि मेगासिटीतील एका अल्पवयीन मुलीमध्ये प्रेमसंबंध होते, मात्र मुलीच्या कुटुंबियांचा विरोध होता. नागेशला शनिवारी रात्री तिच्या घरी मारहाण करून आईला फोन करण्यात आला. टेरेसवर तो पडला होता. रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.



**पनवेल** : राज्य शासनाच्या शिक्षण विभागात समग्र शिक्षा अंतर्गत गेल्या २५ वर्षांपासून अनेक कामगार काम करीत आहेत. यामधील ३३७८ उर्वरित कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याची मागणी समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात समितीच्या सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची रविवारी भेट घेऊन चर्चा केली तसेच मागणीचे निवेदन दिले. यावेळी अभिजित मटकर, समग्र शिक्षा समितीचे प्रदीप सुर्वे, अक्षय पाटील, अशोक तुरे, रोहिणी म्हात्रे, दिलीप पाटील, निलेश मानकवले, सचिन पाटील, प्रशांत धुमाळ, स्वाती पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

# पुण्यात मेट्रोचे २०० किमीचे जाळे उभारणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळाली असून पुणेकरांनी मेट्रो सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सध्या दररोज सुमारे अडीच लाख प्रवासी मेट्रोचा वापर करत आहेत. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वेगाने विकसित होणाऱ्या नागरी विकासाचा विचार करून पुणे मेट्रो आणि नगर विकास विभागाने या संपूर्ण नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील श्री.फडणवीस यांनी दिली.

पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा



नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, बापू पठारे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसेच महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम सुरुवातीला काही अडचणींमुळे उशिरा सुरू झाले असले तरी एकदा गती मिळाल्यानंतर अत्यंत वेगाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. देशातील सर्वाधिक गतिमानतेने पूर्ण होणाऱ्या मेट्रो प्रकल्पांमध्ये पुणे मेट्रोचा उल्लेख केला जातो. मेट्रो स्थानकांचे आधुनिक डिझाइन, मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, प्रवासी सुविधा तसेच अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे.

भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. पुण्याचा वेगाने होणारा नागरी विकास लक्षात घेता या संपूर्ण २०० किलोमीटर नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने पूर्ण करावे, सर्व मार्गांचे डीपीआर एकत्रितपणे तयार करावेत तसेच भविष्यातील ग्रोथ सेंटर्स, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि वाढती उपनगरे यांचा विचार करून मेट्रोचे जाळे विकसित करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी महामेट्रो प्रशासनाला दिल्या. पुढील काळात जमिनीवर, आकाशात आणि भुयारी मार्गांद्वारे वाहतूक व्यवस्था विकसित करून पुणे शहर वाहतूक कोंडीरहित आणि शाश्वत शहर बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पुणे मेट्रो भवन केवळ प्रशासकीय मुख्यालय नसून आधुनिक पुण्याच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि सुयोग्य नियोजनाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही इमारत पुण्याच्या प्रशासकीय वैभवात महत्त्वाची भर घालणारी ठरेल. पुणे मेट्रोसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या कामाचेही त्यांनी स्मरण केले.

### मेट्रो भवन, पुणे ठळक वैशिष्ट्ये

***एकूण क्षेत्रफळ सुमारे८१५० चौ. मीटर. भव्य स्वागत कक्ष व पुण्याच्या सांस्कृतिकवारशाचे दर्शन घडविणारी कला स्थापना.अनुभव केंद्रात पुणे मेट्रोचे जाळे व प्रकल्पाची मॉडेल्स. ३१२ आसनक्षमतेचे सभागृह व बॅकअप संचालन नियंत्रण केंद्र, सिग्नलिंग व दूरसंचार सुविधा. काच दर्शनी भागामुळे नैसर्गिक प्रकाश, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक रचना.***

# अल्पवयीन तरुणीसोबत अश्लील हावभावासह झटापट अन् धमकी

## पोलादपूरमध्ये चौघांविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील आंबेडकरनगर वसाहतीमध्ये असलेल्या बुध्दविहारामध्ये अल्पवयीन तरूणी फिर्यादीच्या भावकीची मिटींग सुरू असताना तेथे चौघांनी येऊन फिर्यादीच्या वडीलांना दमदाटी करणाऱ्यांमुळे भांडण अधिक वाढू नये, यासाठी फिर्यादी अल्पवयीन तरूणीने धाव घेतली असता तिच्या डाव्या डोळ्याला दुखापत करून तिचे केस पकडून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, अशी भाषा केल्याने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये चौघांविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी रात्री पोलादपूर आंबेडकर नगरातील बुध्दविहारामध्ये फिर्यादीच्या भावकीची मिटींग सुरू होती. रात्री रविवारी साडेबाराच्या सुमारास आरोपी उमेश अनंत पवार, दिनेश अनंत पवार आणि योगेश अनंत पवार यांच्यासह दिनेश पवार या आंबेडकर नगरमधील चार तरूणांनी तिथे येऊन १४ एप्रिलच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीमध्ये फिर्यादीच्या वडीलांना फटकविण्याची भाषा मोठमोठया आवाजात केली असता फिर्यादीने अधिक वाद वाढू नये म्हणून मध्ये येऊन वाद मिटवण्याचा प्रयत्न केला असता आरोपी दिनेश पवार याने तिची कॉलर पकडून तिच्या डाव्या डोळ्याला दुखापत केली. आरोपी दिनेश पवार याने फिर्यादीला केस पकडून खाली वाकविले आणि आरोपी योगेश पवार याने फिर्यादी अल्पवयीन तरूणीला उपस्थित लोकांसमोर वाईट हेतूने मिटींग संपू दे, अशी अब्रू लुटण्याची अर्वाच्च व स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल, अशी असभ्य व अश्लिल भाषा केली.

याप्रकरणी, फिर्यादीचे वय १६ वर्षे ११ महिने असल्याने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये चारही आरोपींविरोधात रविवारी पहाटे ३ वाजून २० मिनिटांनी गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अंमलदार सहायक फौजदार जागडे यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर अधिक तपास तपासिक अंमलदार उपनिरिक्षक मंगेश मुंढे हे अधिक तपास करीत आहेत.

# तरुण-तरुणीच्या लग्नानंतर व्याह्यांमध्ये मारहाण; गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कामथे फौजदारवाडी येथे फिर्यादीच्या मुलाने आरोपीच्या मुलीशी पळून जाऊन लग्न केल्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी यांना मारहाण केल्याची घटना ८ मार्च रोजी घडली असून आरोपी विरोधात पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०८मार्च रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कामथे माडाची वाडी येथे फिर्यादी सखाराम कदम यांचा मुलगा आदेश कदम हा वाई येथे कामाला असुन तो दिनांक १३ मार्च पासून वाई येथून मिसिंग आहे. सखाराम कदम यांचा मुलगा आदेश याने आरोपी नामदेव गोगावले यांच्या मुलीबरोबर पळुन जावुन लग्न केले. त्या गोष्टीचा राग मनात धरुन आरोपी नामदेव गोगावले यांनी फिर्यादी यास तु गावात राहु नकोस, असे बोलुन शिवीगाळी करुन ठार मारण्याची धमकी देत हातातील लाकडी काठीने फिर्यादी यांच्या डाव्या हाताला मारुन जबर दुखापत केली.

# कर्जतमध्ये शुक्रवार, शनिवार आणि रविवारी अवजड वाहनांना प्रवेशबंदी

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने कर्जत शहरात शुक्रवार, शनिवार आणि रविवारी दिवसा अवजड वाहनास प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. कर्जत शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या आदेशामुळे काही प्रमाणात होणारी वाहतूक कोंडीची सुटका होणार आहे.

कर्जत शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात शाळा, माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये तसेच व्यवसायिक शिक्षणाची महाविद्यालये आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ये - जा करण्यासाठी रिक्षा तसेच बसेस यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सुमारे साडे तीन हजार इतके फार्म हाऊस असून या फार्म हाऊस वरती सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी प्रचंड मोठ्या प्रमाणावर मुंबई ठाणे व पुणे येथील पर्यटकांची नियमित वर्दळ असते.

कर्जत येथे मध्य रेल्वेचे कर्जत जंक्शन असून कर्जत जंक्शन येथून लोणावळा पुणे मार्गे पुणे तसेच भारत देशामध्ये इतरत्र जाणाऱ्या सर्व प्रवासी रेल्वे गाड्या तसेच माल गाड्यांना कर्जत जंक्शन असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची वर्दळ असते.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५८४ ए वर कर्जत शहरांमध्ये येण्या जाण्याकरता कर्जत रेल्वे लाईनवर चार फाटा येथे एक पूल आणि कर्जत शहरांमध्ये उल्हास नदीवर श्रीराम पूल असे दोन पूल असून सदरचे दोन्ही पूल अरुंद असल्याने त्या मार्गावर केवळ दुहेरी मार्गीका अशी व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. त्यातच अवजड वाहतुकीच्या वाहनांमुळे या ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन वाहतूक ठप्प होते. सदरची वाहतूक कोंडी सोडवण्याकरता अन्य कोणतेही पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने या वाहतूक कोंडीचा स्थानिक नागरिकांना तसेच या महामार्गा वरून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना व शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास व मनस्ताप सहन करावा लागत आहे.

चारफाटा रेल्वे ब्रिज व श्रीराम पुल या ठिकाणी वाहतूक कोंडी सोडवण्याकरता अवजड वाहनांना दिवसा कर्जत शहरांमध्ये प्रवेश करण्यापासून रोखणे हाच केवल उपाय शिल्लक असल्याने रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी हा आदेश जारी केला आहे. हा आदेश १२ मार्च २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहे. प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवसांमध्ये कर्जत शहरांमध्ये सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत अवजड वाहनांना बंदी असणार आहे. यामध्ये दूध, पेट्रोल, डिझेल स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला पाणी वाहतूक करणाऱ्या वाहनांना या बंदी मध्ये प्रवेश असणार आहे

# नियमित उपचारांनी काचबिंदू विकार आटोक्यात राहू शकतो; अलिबागमधील नेत्ररोगतज्ज्ञांचे मत

**अलिबाग : प्रतिनिधी**

काचबिंदू हा एक छुपा आजार असून त्यामुळे नकळत दृष्टीहीनता येण्याची शक्यता असते. सुरुवातीला या आजाराविषयी पुर्णतः अनभिज्ञ असलेल्या बहुतांश रुग्णांना कालांतराने पुढील टप्प्यावर अंधत्व येण्याचीही शक्यता असते. तथापी नियमित तपासणी आणि योग्य उपचारांनी हा विकार आटोक्यात ठेवून अंधत्व रोखता येते असे मत अलिबागमधील नेत्ररोग तज्ज्ञांनी जागतिक काचबिंदू सप्ताहानिमित्त आयोजित चर्चासत्रात व्यक्त केले.

विद्यासन एज्यूकेशन फाउंडेशनतर्फे राष्ट्रीय केमिकल्स ण्ड फर्टीलायझर्सच्या सहयोगाने काचबिंदू जागरूकता




कार्यक्रमाचे आयोजन येथील पीएनपी नाट्यगृहात शनिवार दिनांक १४ मार्च रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सुरुवातील लक्ष्मी कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पनवेलच्या विद्यार्थ्यांनी काचबिंदूची माहिती देणारी लघुनाटिका सादर केली. त्यानंतर 'काचबिंदू : कारणे व उपाय' या विषयावरील चर्चासत्रात डॉ अशोक इंगळे, डॉ विजय जाधव, डॉ अजय इंगळे, डॉ समीर नाईक, डॉ नीरज कुमठेकर व डॉ संपदा चितळे या नेत्ररोग तज्ज्ञांनी या आजारावर चर्चा करत उपस्थितांना काचबिंदू या आजाराविषयी उद्बोधक माहिती दिली. चर्चासत्राचे समन्वयन डॉ रिटा धामणकर यांनी केले.

अलिबागच्या नगराध्यक्ष अक्षया नाईक, आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, मानव संपदा उपमहाव्यवस्थापक प्रशांत पाटील, जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे, ज्येष्ठ विधीज्ञ प्रसाद पाटील यांसह बहुसंख्य नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ राजीव धामणकर यांनी काचबिंदू विषयी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठीच्या प्रतिबद्धतेची शपथ उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष वझे यांनी केले.

# मोहाचीवाडीतील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ नजिकच्या मोहाची वाडी मधील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रवेशाचे महत्व वाढले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असा शब्द दिला.

याप्रसंगी राजिप बांधकाम समितीचे माजी सभापती पुंडलिक पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, माजी सभापती धोंडू राणे, उपस्थित होते.

पान १ वरुन

## जनतेच्या सोयीसाठी शासन थेट दारी -आमदार प्रशांत ठाकूर

शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणी, कृषी विभाग नोंदणी सेवा, भूमी अभिलेख विभागाकडून नकलप्रती व मोजणी अर्ज, सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्रे तसेच आयुष्मान भारत कार्ड नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर उपाय सुचवणारे लघु विज्ञान प्रदर्शन सादर केले. महिला सशक्तीकरणासाठी महिलांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांचे स्टॉलही लावण्यात आले होते.

यावेळी जातीचे दाखले, प्रलंबित फेरफार, सातबारामधील चुकांची दुरूस्ती, उत्पन्नाचे दाखले, आरोग्य योजना, भूमी अभिलेख योजना, आधार कार्ड दुरूस्ती यासारख्या अनेक प्रमाणपत्रांचे वाटप आणि विविध योजनांचा थेट लाभ एकूण एक हजार ४२८ नागरिकांना देण्यात आला.

# मोर्बा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास नागरिकांचा लाभला प्रतिसाद

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यातील मोर्बा येथील एस. एस. हायस्कूल परिसरात १४ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे, माणगांवचे उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप तसेच तहसीलदार विपीन लोकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले.



तहसील कार्यालय माणगांव (मंडळ - मोर्बा) यांच्या वतीने आयोजित या शिबिरात महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचे निराकरण करण्यात आले. मंडळ अधिकारी मोर्बा वैशाली सत्वे यांच्या अंतर्गत येणाऱ्या तलाठी सजा मोर्बा, देगाव, साई, वडवली, चांदोरे, दहिवली येथील नागरिकांसाठी आज शिबीर घेण्यात आले.

दुपारी २ वाजेपर्यंत २०० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिरामध्ये ७/१२ मधील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे, उत्पन्न, रहिवासी व जातीचे दाखले, नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र, तसेच विविध महसूल विषयक अर्जांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय अकृषिक प्रकरणे, तुकडेबंदी कायद्यांतर्गत प्रकरणांचा निपटारा,ई-मोजणी अर्ज, पीएम किसान नोंदणी तसेच इतर महसूल सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या. एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य अस्लम राऊत, सुभाष केकाणे,शादाब गैंबी, अल्ताफ धनसे, सरपंच शौकत रोहेकर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामाविरोधात धडक मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व मा. अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत, से-०२, ऐरोली, नवी मुंबई येथे बबन बाबू पवार, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी तसेच से-०२, ऐरोली, नवी मुंबई येथे प्रेमानंद प्रजापती, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. यांच्या अनधिकृत बांधकामांस पालिकेमार्गत नोटीस बजाविण्यात आलेली होती.

# पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाचा शुभारंभ



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्हा आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाचा शुभारंभ भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते शनिवारी बेलापूर पारसिक हिल येथील सद्गुरू विश्वनाथ महाराज समाधी मंदिर या ठिकाणी करण्यातआला

या प्रसंगी भाजपा माजी प्रदेश उपाध्यक्षा प्रा.वर्षा भोसले, कोकण विभागीय संघटक, परिवहन समिती सदस्य अभिजित पेडणेकर, ज्येष्ठ नगरसेवक डॉ जयाजी नाथ, नगरसेविका स्वाती गुरखे- साटम, नगरसेविका सुरेखा नरबागे, समाजसेवक अशोक नरबागे, गोपाळराव गायकवाड, मंडळ अध्यक्ष अजय आनंद सिंह, प्रमोद जोशी, मनेश बिजलानी, डॉ. प्रसाद वि खाडिलकर, तेजस्वी कुंदन म्हात्रे, जयदेव ठाकूर, नीलेश कदम, दामोदरन पिल्लई तसेच भारतीय जनता पार्टीचे मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.वर्षा भोसले आणि अभिजीत पेडणेकर यांनी प्रशिक्षण महाभियानाची सुरुवात केली. भाजपच्या माध्यमातून संपूर्ण देशभर प्रशिक्षण महाअभियान सुरू असून १४ मार्च रोजी बेलापूर मंडळात प्रशिक्षण अभियान सुरू असून हे अभियान दोन दिवस आहे .

यावेळी माध्यमांशी बोलताना भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉक्टर राजेश पाटील यांनी सांगितले की भाजपचा इतिहास, कार्य, राष्ट्र हिताचे विचार भाजपाच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहचले पाहिजेत.
त्यामागे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपच्या नेत्यांनी केलेला त्याग, समर्पण, सातत्य, वैचारिक अधिष्ठान आहे. हेच सातत्य प्रत्येक कार्यकर्त्याच्या नसानसांमध्ये भिनलं पाहिजे. त्यातून एक सक्षम कार्यकर्ता तयार व्हायला पाहिजे.

## निवडक

### गोमांस वाहतूकप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** गोवंश मांसाची वाहतूक केल्याप्रकरणी पिकअप चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कोनगाव येथे पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअपमधून जवळपास एक हजार किलो वजनाचे गोवंश मांस विक्रीसाठी घेऊन जाताना पोलिसांना आढळले. या प्रकरणी पोलिसांनी वाहनचालकावर गुन्हा दाखल करून पिकअप तसेच गोवंश मांस हस्तगत केले. एकूण पिकअप गाडीसह सात लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### लग्नाच्या भूलथापा देत अत्याचार

**पनवेल :** कल्याण येथील तरुणाने २९ वर्षीय तरुणीला लग्नाच्या भूलथापा देऊन तिच्यावर तीन वर्षे अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी खदिश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विनायक बंडफ्या बेल्लाले (वय २९) हा कल्याणमधील म्हारळ गाव येथे, तर पीडित तरुणी गोवंडी येथे राहण्यास आहे. तीन वर्षांपूर्वी विनायकने तरुणीसोबत मैत्री करून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर त्याने तरुणीचा विश्वास संपादन करून लग्नाच्या भूलथापा दिल्या. अखेर त्याने लग्नास नकार दिल्याचे तरुणीने तक्रार दाखल केली.

### स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलन

**मोहोपाडा :** आई फाउंडेशन रायगड, समृध्दी प्रकाशन आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रायगड जिल्हा यांच्या वतीने स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलनाचे आयोजन ३ एप्रिल रोजी महाड येथे करण्यात आले आहे. या संमेलनात अभिनेते अजय तपकिरे हे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी नामांकन मागविण्यात आली असून २० मार्च २०२६ पर्यंत आपापली नामांकने राकेश खराडे, जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ९६६५३१४११५/८८०५३२१८९५ यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती घ्यावी, असे आवाहन समृध्दी प्रकाशनचे डायरेक्टर विश्वनाथ खरात यांनी केले आहे.

# उरणमध्ये ३.३० कोटींचा घोटाळा उघडकीस

- **सारडे येथील एकाच कुटुंबातील तीन आरोपी फरार**
- **तपास नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग होणार**

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये सतीश गावंड नंतर पुन्हा चिटफंड गुन्ह्यांची मालिका सुरू झाली आहे. तीन कोटी ३० लाखांहून अधिक असलेल्या या गुन्ह्यांचा तपास नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे उरण पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

सतीश गावंड यांनी चिटफंडद्वारे गुंतवणूकदारांना दुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून सुमारे शेकडो कोटींची फसवणूक केली होती. हे प्रकरण चांगलेच गाजले होते. त्यानंतर तालुक्यातील सारडे येथील एकाच कुटुंबातील तिघांनी १५ दिवसात दुप्पट परताव्याचे आमिष दाखवून १७ गुंतवणूकदारांकडून तब्बल तीन कोटी ३० लाखांहून अधिक रुपये जमा केले, मात्र मुद्दल, परताव्याची रक्कम न देताच फसवणूक करून पलायन केल्याचे उघडकीस आले आहे.

सारडे गावातील प्रवीण पाटील (वय ४६), विनायक पाटील (वय ४३) आणि कमिक्षा पाटील (वय ३७) या कुटुंबाने वर्षभरापूर्वी चिटफंडची गुंतवणूक योजना सुरू केली होती. गुंतवणुक करणाऱ्यांना १५ दिवसांत दुप्पट परतावा मिळेल असे आमिषही दाखविण्यात आले होते. सुरुवातीला काही लोकांना परतावा देऊन त्यांचा विश्वासही संपादन केला. या विश्वासाच्या जोरावर त्यांनी १७ गुंतवणूकदारांकडून तीन कोटी ३० लाखांहून अधिक रक्कम जमा केली, मात्र त्यानंतर गुंतवणूकदारांनी दुप्पटीच्या परताव्यासाठी तगादा लावला.

परतावा देण्याऐवजी त्यांनी गुंतवणूकदारांची फसवणूक करून पलायनाचा अघोरी मार्ग स्वीकारला. फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांनी उरण पोलिस ठाण्यात फसवणुकीची फिर्याद दाखल केली. त्यानंतर गुन्हाही नोंदविण्यात आला, मात्र आरोपी रफुचक्कर झाले. दरम्यान, चिटफंड घोटाळा तीन कोटींपेक्षा अधिक रकमेचा आहे. त्यामुळे याप्रकरणाचा तपास नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती उरण पोलिसांनी दिली.

# सी-५३ बेस्ट बस सकाळी लवकर सुरू करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बेस्टचे वाहतूक व्यवस्थापक यांना सीट ५३ बसच्या सकाळी फेऱ्या वाढवण्यासाठी कळंबोलीतील भाजपच्या नगरसेविका बायजा बबन बारगजे यांनी पत्र दिले आहे.

सी ५३ ही घाटकोपर वरून सुटणारी बस सकाळी तीन फेऱ्या नेरूळ पर्यंतच चालतात त्या तीन फेऱ्या जर सकाळी कळंबोली पर्यंत चालू केल्या तर कळंबोली सह कामोठे खारघर बेलापूर या ठिकाणच्या रहिवाशांना मुंबईला जाण्यासाठी बस सेवा उपलब्ध होईल व या ठिकाणच्या सर्व रहिवासी व प्रवाशांची प्रवासाच्या त्रासातून सुटका होईल कारण सकाळी एसटीच्या फेऱ्या नसतात एनएमएमटीच्या पण नसतात. त्यामुळे प्रवाशांना त्रास होत आहे.

याचीच दखल घेऊन नगरसेविका बायजा बबन बारगजे यांनी बेस्टचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक यांना पत्र लिहून सकाळच्या बसेस चालू करण्याची विनंती केली आहे लवकरच ही बस सेवा कळंबोलीपर्यंत चालू होईल, असे आश्वासन बेस्टचे वाहतूक व्यवस्थापक यांनी दिले आहे.

# भारत गॅस एजन्सीसोबत भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्यासोबत भारत गॅस एजन्सी नवीन पनवेल यांच्याकडे बैठक पार पडली आहे.

सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आपल्या पनवेल परिसरात घरगुती गॅस सिलेंडरबाबत विविध प्रकारच्या अफवा पसरवल्या जात आहेत. काही ठिकाणी गॅसचा तुटवडा होणार असल्याची चुकीची माहिती पसरवली जात आहे.

प्रत्यक्षात घरगुती गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नाही, परंतु टीव्हीवरील बातम्यांमुळे अनेक नागरिकांमध्ये अनावश्यक घबराट निर्माण होत आहे. त्यामुळे लोक गरज नसतानाही गॅस सिलेंडरसाठी एजन्सीकडे धाव घेत आहेत.

या संदर्भात आपल्या सर्व पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना, विनंती केली आहे की त्यांनी आपल्या परिसरातील गॅस एजन्सीच्या वितरकांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली तसेच या विषयावर तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांच्याशीही चर्चा करण्यात आलेली आहे, आणि कुठल्याही प्रकारचा तुटवडा नसल्याची खात्री देण्यात आली आहे.

म्हणून माझी आपल्या सर्व नागरिकांना नम्र विनंती आहे की कृपया घाबरू नका आणि अनावश्यकपणे गॅस सिलेंडरसाठी रांगा लावू नका. काहीही अड्चण येत असल्यास संपर्क करा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# श्री साई टेलिकॉमच्या तिसऱ्या शोरूमचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मराठी माणसाचे हक्काचे दुकान म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या 'श्री साई टेलिकॉम'च्या तिसऱ्या नवीन शोरूमचा भव्य शुभारंभ शनिवारी पनवेलमध्ये अत्यंत उत्साहात झाला. संजय पाटील आणि जयेश पाटील यांनी सुरू केलेले हे अद्ययावत शोरूम छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अजिंक्य बिल्डिंगमध्ये ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले आहे.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण सिनेअभिनेत्री अमृता खानविलकर यांची उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत या शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, श्री साई टेलिकॉममध्ये विविध नामांकित कंपन्यांचे मोबाईल उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संचालक जयेश पाटील यांनी अतिशय सचोटीने आणि प्रामाणिकपणे आपला व्यवसाय विस्तारला असून, प्रत्येक ग्राहकाचे समाधान करण्यामध्ये ते यशस्वी ठरले आहेत. तर पनवेलकरांचे प्रेम असल्यामुळेच श्री साई टेलिकॉमची ही तिसरी शाखा सुरू झाली आहे, असे प्रतिपादन अमृता खानविलकर यांनी यावेळी केले. आता पनवेलकरांना एकाच छताखाली नामांकित कंपन्यांचे मोबाईल आणि सर्व प्रकारच्या क्सेसरीज उपलब्ध होणार आहेत.

या उद्घाटन सोहळ्याला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महापालिकेचे नगरसेवक राजू सोनी, सुमित झुंझारराव, नगरसेविका दर्शना भोईर, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, सपना पाटील, जयेश पाटील, संजय पाटील, हारू भगत, पंकज वेशविकर, हर्षद कोळी, विलास पाटील, आकाश जाधव, नितीन पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कर्मचारी वर्ग आणि नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, या दुकानातून खरेदी करणाऱ्या पहिल्या ५०० ग्राहकांना विशेष गिफ्ट देण्यात येणार असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी -श्री साई टेलिकॉम'च्यावतीने करण्यात आले.



**पनवेल : डेरवलीकरांच्या सेवेत विष्णू वंदन रेसिडेन्सीमध्ये रमाकांतशेठ पाटील आणि अविनाश पाटील यांच्या 'पाटील फिटनेस (पीएफ) या फिटनेस सेंटरच्या नव्या शाखेचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यास आमदार महेश बालदी, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, श्रुती डेव्हलपर्सचे लक्ष्मण भाटेशरा व फिटनेस क्षेत्रातील सेलेब्रिटी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे निमंत्रण आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात आले.**

# युवा कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्षाची विकासकामे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून अनेक तरुण भाजपमध्ये सहभागी होत आहेत. याच पार्श्वभूमीवर, भाजप युवा मोर्चाचे सदस्य सार्थक दबके यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमधील युवा कार्यकर्ते यश भगत, शंतनू पवार आणि यश गौड यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

या प्रवेशकर्त्यांचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पक्षात स्वागत करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष तथा पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक अजय बहिरा, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, मयुर कदम, सुनील पाटील, अंकुश पाटील, सार्थक आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये भटक्या श्वानांना खाद्य टाकण्याची ठिकाणे निश्चित

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात भटक्या श्वानांसाठी तब्बल ४० खाद्यठिकाणे ठरविण्यात महापालिकेच्या पशु वैद्यकीय आरोग्य विभागाला यश आले आहे. श्वानप्रेमींच्या मागणीनंतर ही कारवाई करण्यात आली. खाद्यपदार्थामुळे भटके श्वान आणि माणसांमध्ये संघर्ष टाळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांसाठी महापालिका स्तरावर शहरातील निर्जनस्थळी स्वतंत्र खाद्यठिकाणे ठरवून देण्याचे निर्देश होते.

पनवेल महापालिकेमधील भटक्या श्वानांची काळजी करणार्या काही संस्था आणि श्वानप्रेमींनी केलेल्या मागणीनंतर ही ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. पनवेल महापालिकेने भटक्या श्वानांसाठी निश्चित केलेल्या खाद्य ठिकाणांमध्ये १९ ठिकाणे ही खारघर वसाहतीमध्ये असल्याची माहिती पनवेल महापालिकेच्या पशू वैद्यकीय आरोग्य विभागाने दिली.

पनवेल महापालिका क्षेत्रातील इतर श्वानप्रेमीही भटक्या श्वानांसाठी खाद्यपदार्थाची ठिकाणे पशु वैद्यकीय विभागाला सूचवू शकतील. ही ठिकाणी निश्चित करताना दवाखाना, शाळा आणि मंदिर अशा वर्दळीची ठिकाणांपासून हे ठिकाण दूर असावे, अशी मुख्य अट आहे.

पनवेल महापालिकेने एआयच्या माध्यमातून पालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांचे सर्वेक्षण केले आहे. यामध्ये श्वानांचे फोटो आणि त्यांची ओळख अशी माहिती एका सॉफ्टवेअरमध्ये संकलित केली आहे. या सर्वेक्षणानुसार पनवेलमध्ये २० हजार भटके श्वान आणि खासगी पाच हजार श्वान असल्याचे स्पष्ट झाले. अशा पद्धतीने एआयच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे सर्वेक्षण करणारी पनवेल ही एकमेव महापालिका आहे.

**पनवेल : श्री संत भगवानबाबा व वामनभाऊ तसेच विठ्ठल रखुमाई प्राणप्रतिष्ठा सोहळा खांदा कॉलनीमध्ये रविवारी झाला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, कुसुम पाटील, बायजा बारगजे, बबन बारगजे, भाजपचे शहर उपाध्यक्ष गोपीनाथ मुंडे, पनवेल शहर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष जयंत भगत, दिलीप कोरडे यांच्यासह संत भगवानबाबा व वामनभाऊ सेवा मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.**



# उरणमध्ये भंगार गोदामात आढळला १० फूट लांबीचा अजगर

**उरण : वार्ताहर**



उरण न्यायालय परिसरात असलेल्या एका भंगार गोदामामध्ये अचानक भलामोठा साप आढळून आल्याने तेथील कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली. गोदामात काम करत असताना कर्मचाऱ्यांच्या नजरेस मोठ्या आकाराचा साप पडताच त्यांनी तातडीने सर्पमित्रांना माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र भद्री व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

गोदामातील साहित्याच्या ढिगाऱ्यामध्ये लपलेल्या सापाला शोधून काढत त्यांनी काळजीपूर्वक त्याला पकडले. सर्पमित्रांनी नवराष्ट्राला दिलेल्या माहितीनुसार हा साप इंडियन रॉक पायथन म्हणजेच भारतीय अजगर जातीचा असून सुमारे १० फूट लांबीचा व जवळपास ३० किलो वजनाचा आहे. एवढ्या मोठ्या आकाराचा साप पाहून परिसरातील नागरिकही काही काळ भयभीत झाले होते.

सर्पमित्रांनी अत्यंत सावधगिरीने अजगराला पकडून सुरक्षित पिशवीत ठेवले आणि त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. त्यामुळे या अजगराला जीवनदान मिळाले असून कोणतीही जीवितहानी टळली.

भारतीय अजगराबाबत माहिती भारतीय अजगर हा भारतात आढळणारा मोठ्या आकाराचा, पण साधारणतः बिनविषारी साप आहे. तो प्रामुख्याने जंगल, डोंगराळ भाग, पाणथळ जागा तसेच मानवी वस्तीजवळील झुडपी भागात आढळतो. अजगर आपल्या शिकाराला विळखा घालून पकडतो आणि नंतर ती गिळतो. उंदीर, ससे, पक्षी, कोंबड्या यांसारख्या प्राण्यांवर तो उपजीविका करतो.

तज्ज्ञांच्या मते इंडियन रॉक पायथन हा पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा साप असून तो उंदरांसारख्या किटकांचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे आवश्यक मानले जाते. भारतात हा साप वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत संरक्षित प्रजातींमध्ये समाविष्ट आहे.

सर्पमित्र भद्री यांनी सांगितले की, उरण परिसरात अलीकडच्या काळात अजगर सापांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. झाडी, पाणथळ भाग आणि उंदरांची उपलब्धता यामुळे हे साप अनेकदा मानवी वस्तीजवळ येतात. अशा वेळी नागरिकांनी घाबरून सापाला मारण्याचा प्रयत्न न करता तातडीने सर्पमित्र किंवा वन विभागाला कळवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# एमएनएम विद्यालयाची विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमएनएम विद्यालयातील इयत्ता आठवीमधील विद्यार्थिनी याज्ञि महाडिक हिने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे पुरस्कृत अटल टिंकरिंग लॅब आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये यांत्रिकी विभागामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला.

या स्पर्धेचे आयोजन याकूब बेग उर्दू स्कूल पनवेल येथे करण्यात आले. स्पर्धेकरिता तालुक्यातील विविध शहरी तसेच ग्रामीण भागातील शाळेमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अटल टिंकरिंग लॅबचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना प्रयोग, संशोधन आणि नवकल्पना यासाठी प्रोत्साहन देऊन त्यांना भविष्यकालीन वैज्ञानिक आणि उद्योजक बनवणे.

विज्ञान प्रदर्शनातील यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर यांनी विद्यार्थिनीचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. अटल टिंकरिंग लॅबच्या याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण उपक्रम, वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत होऊन विद्यार्थ्यांना नवे व्यासपीठ उपलब्ध होत आहे, असे मत मांडले. या स्पर्धेकरिता परेश पावसकर, वंदना जाधव, प्रगती यशवंतराव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थीचे कौतुक केले.



**पनवेल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना येथील नाक्यावर एका जातीयवादीने पिण्यासाठी पाणी नाकारले. हे पाहून सोनबा येलवे नावाचा माणूस धावत पळत त्याच्या घरी गेला आणि पाण्याचा माठ घेऊन नाक्यावर आला. तोपर्यंत बाबासाहेब तेथून पुढील प्रवासाला निघून गेले होते. सोनबा येलवे रोज या नाक्यावर पाण्याचा माठ घेऊन बसायचा की, बाबासाहेब कधीतरी इथे येतील आणि माझ्या माठातील पाणी पितील. अशी वाट पाहत पाहत तिथेच त्यांचा जीव गेला, ही इतिहासात नोंद आहे. त्या सोनबा येलवे यांचे नातू सदानंद येलवे यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेवक प्रकाश बिनेदार व अन्य.

## संपादकीय


# भारताची संतुलित परराष्ट्रनीती

**मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग मिळाल्यामुळे ऊर्जा पुरवठ्यावरील संभाव्य संकट काही प्रमाणात टळले आहे. यामागे भारताची संतुलित परराष्ट्रनीती, मुत्सद्देगिरी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विश्वासार्हता यांचा मोठा वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक राजकारणात एक स्वतंत्र आणि विश्वासार्ह भूमिका निर्माण केली आहे.**

भारत हा जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयातदार देशांपैकी एक असल्याने मध्यपूर्वेतील संघर्षाचा परिणाम भारतावर होण्याची शक्यता मोठी होती, मात्र अलीकडे इराणच्या राजदूतांनी भारताबद्दल सकारात्मक भूमिका घेत भारतीय जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग देण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे भारताच्या ऊर्जापुरवठ्याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता काही प्रमाणात दूर झाली आहे. जागतिक ऊर्जा वाहतुकीच्या दृष्टीने होर्मुझ सामुद्रधुनी हे अत्यंत महत्त्वाचे समुद्री मार्ग मानले जाते. पर्शियन आखात आणि ओमानच्या आखाताला जोडणारी ही सामुद्रधुनी जगातील सर्वाधिक व्यस्त आणि संवेदनशील समुद्री मार्गांपैकी एक आहे. जगातील जवळपास २० टक्के कच्चे तेल आणि मोठ्या प्रमाणातील द्रवित नैसर्गिक वायू या मार्गाने वाहतूक केला जातो. त्यामुळे येथे तणाव निर्माण झाला तर त्याचा परिणाम थेट जागतिक ऊर्जा बाजारावर होतो. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे या सामुद्रधुनीतून जहाजांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. अनेक देशांनी आपल्या जहाजांना सावधगिरी बाळगण्याचे निर्देश दिले होते. अशा वेळी भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग देण्याचा इराणचा निर्णय भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या निर्णयानंतर ‘शिवालिक’ आणि ‘नंदादेवी’ या दोन जहाजांनी यशस्वीरित्या होर्मुझ सामुद्रधुनी पार केली आहेत. या जहाजांमध्ये सुमारे ९२,७०० मेट्रिक टन एलपीजी असल्याचे सांगितले जात आहे. ही जहाजे भारतात दाखल झाल्यानंतर देशातील गॅसपुरवठ्याला मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय इतर भारतीय जहाजांसाठीही मार्ग मोकळा झाल्याने आगामी काळात ऊर्जापुरवठा सुरळीत राहण्याची शक्यता आहे. जगातील अनेक देशांना युद्धाच्या झळा बसत असताना भारतासाठी हा एक सकारात्मक संकेत मानला जात आहे. या संपूर्ण घडामोडींमध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारताने अनेक वर्षांपासून मध्यपूर्वेतील देशांशी संतुलित आणि व्यावहारिक संबंध राखले आहेत. एकीकडे भारताचे इस्त्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मजबूत संबंध आहेत, तर दुसरीकडे इराणसह ऊर्जा आणि व्यापार क्षेत्रातील सहकार्यही कायम ठेवले आहे. या संतुलित धोरणामुळे भारताला दोन्ही बाजूंशी संवाद ठेवणे शक्य झाले आहे. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने बहुआयामी परराष्ट्र धोरण अवलंबले आहे. या धोरणात कोणत्याही एका गटाशी पूर्णतः बांधील राहण्याऐवजी सर्व देशांशी हितसंबंध जपण्यावर भर देण्यात आला आहे. यात भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मुत्सद्देगिरीचे महत्त्वही अधोरेखित होते. भारताचे परराष्ट्र मंत्रालय सतत विविध देशांशी संवाद साधत असते. संकटाच्या काळात संवाद आणि विश्वास या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. युद्धाच्या छायेतही भारताने आपले हितसंबंध जपले, हीच या संपूर्ण घडामोडींची सर्वात मोठी सकारात्मक बाब आहे. यासाठी पंतप्रधान मोदी सरकारचे प्रयत्न कौतुकास्पद ठरले आहेत.

# नामसाधर्म्यामुळे राजकारण्यांबरोबरच सामान्यांनाही बसतोय फटका

**खबरबात**
**विजय मांडे**



एकच नाव व आडनाव अनेकांचे असणे म्हणजे अनेकांना त्या नाम साधर्म्याचा कमी अधिक फटका बसतो. त्यापासून राजकारणीसुद्धा सुटत नाहीत. पूर्वीचे दिवस वेगळे होते. एकच नाव आणि आडनाव असणाऱ्यांना टोपण नावे असायची शिवाय त्या काळातील लोक सच्चे होते. त्यांना आपुलकी होती. दिवसेंदिवस हे बदलत गेले आणि आपल्या स्वार्थासाठी या नामसाधर्म्याचा उपयोग करून घेऊ लागली. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

पूर्वीचा काळच वेगळा होता. नाती गोती जपली जात होती. एकत्र कुटुंब पद्धती होती. कुटुंबातील शेती कुटुंबातील मुख्य किंवा कर्त्या पुरुषाच्या नावावर होती. त्यावेळी कुणीही त्यांच्याबद्दल ब्र शब्दही काढत नसतं. जमाना बदलला आणि पैसा हेच सर्वस्व होऊ लागले. त्यामुळे एका घराची अनेक घरे झाली. भावा-भावामध्ये मतभेद होऊ लागले. त्यामुळे माणुसकी उरली नाही. कुणाचे काय लुबाडायला मिळेल. याकडे काहींचा ओढा आहे. त्यामुळे अनेक गोष्टी ऐकायला मिळतात.

हल्ली अगदी ग्रामपंचायत निवडणुकीपासून ते लोकसभा निवडणुकीपर्यंत एखादा उमेदवार उभा राहिला आणि तो एखाद्या उमेदवाराला जड जाईल असे होणार असेल तर त्या उमेदवाराच्या साधर्म्याच्या व्यक्ती शोधून त्यांचे उमेदवारी अर्ज भरले जातात आणि त्या डमी उमेदवारांना अर्ज मागे घेण्याच्या मुदती पर्यंत आपल्या ताब्यात ठेऊन घेत असत, जेणेकरून समोरच्यांच्या दबाला बळी जाऊन त्याने आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ नये. या चार पाच दिवसात त्या डमी उमेदवाराला आणि त्याच्या कुटुंबियांना काही कमी पडत नसे मात्र एकदा निवडणूक झाली की तू कोण आणि मी कोण? अशी परिस्थिती होते.

कर्जतचे तीन वेळा आमदार झालेले सुरेश लाड यांच्या दोन तीन निवडणुकीत सारखे नाव असलेले तीन-चार डमी उमेदवार उभे केले होते, तर संतोष भोईर यांनी विधानसभेची निवडणूक लढविली होती. त्यावेळीही त्यांच्या नावाचे डमी उमेदवार उभे केले होते. माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले, माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी मंत्री मीनाक्षी पाटील, आमदार विवेक पाटील, बाळाराम पाटील, आमदार महेंद्र थोरवे यांच्या बाबतीतही हे घडले होते. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत जे.एम. म्हात्रे यांच्याबाबतीतसुद्धा नाम साधर्म्याचा फटका बसला होता. या प्रकारातून आमदार प्रशांत ठाकूरही सुटले नाहीत. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुधाकर घारे यांनी अपक्ष निवडणूक लढविली होती. त्यावेळी त्यांच्या नावाचे दोन डमी उमेदवार उभे करण्यात आले होते. त्याचा फटका त्यांना बसला. हे अगदी लोकसभेच्या निवडणुकीतही घडले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी निवडणूक लढविली त्यावेळी त्यांचे नाम साधर्म असलेला उमेदवार उभा केला होता. हे सारे प्रकार राजकारणामध्ये झाले.

या नामसाधर्म्याचा फटका अलीकडे शेतकरीवर्गालाही बसू लागला आहे. एखाद्या शेतकऱ्याला जमीन विकायची नसेल तर त्याला बाजूला ठेवून त्याचे नामसाधर्म असलेल्या डमी शेतकऱ्याला उभे करून प्रसंगी तसे बनावट आधार कार्ड बनवून जमीन लाटण्याचे कामही होत आहे. याची कल्पना त्या मूळ शेतकऱ्याला नसते. जेंव्हा कधी तो मूळ जमीन मालक सात बारा उतारा काढण्यासाठी जातो. तेव्हा त्याला समजते की आपली जमीन परस्पर विकली गेली आहे, मात्र त्यावेळी उशीर झालेला असतो. मग कोर्ट कचेऱ्या कराव्या लागतात. नाहक आर्थिक भुर्दंड बसतो. शारीरिक व मनसिक त्रास होतो. तो वेगळाच.

या नामसाधर्म्याचा फटका सामान्य माणसांनाही बसतो. काल परवाच दुचाकी चोरी संबंधी पकडलेला तालुक्यातील साळोख गावातील प्रदीप चंद्रकांत कडू या वीस वर्षीय तरुणाला पोलिसांनी पकडले. त्याच्या कडून त्याच्या सहकाऱ्यांनाही अटक करण्यात आली. ही माहिती देण्यासाठी पोलिसांनी पत्रकार परिषद घेतली. त्यामुळे सोशल मीडिया, वर्तमानपत्रांमध्ये त्याबद्दल बातम्या आल्या. साळोख गावात दोन चंद्रकांत कडू आहेत. प्रगतशील शेतकरी आणि शीघ्र कवी म्हणून ओळखले जाणारे चंद्रकांत तात्याजी कडू त्यांना दादा कडू म्हणून ओळखतात आणि इस्त्रीचा व्यवसाय करणारे चंद्रकांत जनार्दन कडू हे आहेत. त्यांना चंदर बुवा म्हणून ओळखतात. दुचाकी चोरी करणारा इस्त्री व्यवसाय करणाऱ्या चंद्रकांत कडू यांचा मुलगा आहे, मात्र तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील लोकांचा समज झाला कविवर्य चंद्रकांत कडू यांचा मुलगा असावा. त्यामुळे कविवर्य कडूंना चौकशीसाठी खूप फोन आले. इतकेच नव्हे तर त्यांच्या भावांना, विवाह झालेल्या मुलींना, जावयांनाही फोन आले. हा उगाचच मनस्ताप झाला. त्यामुळे नाम साधर्म्याचा फटका कुणाला बसेल हे सांगता येत नाही.

पाटील, थोरवे, शिंदे, तटकरे, घारे, ठाकूर, ठाकरे, सावंत आदी नावे जिल्हा भरात खूप आहेत. त्यामुळे नाम साधार्म्य असणे नैसर्गिक असते, परंतु त्याचा वापर कसा केला जातो. ते आपल्याला नेहमीच अनुभवायला मिळतो. त्याला काही इलाज नाही. इतकी लोकसंख्या वाढली आहे की तीच तीच नावे ठेवण्याशिवाय गत्यंतरच नाही. त्यामुळे असे प्रकार यापुढेही झाले तर नवल नाही.

## अष्टपैलू व्यक्तिमत्व वि.स. पागे

ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती या क्षेत्रात देशातील इतर राज्यांना आदर्श ठरलेल्या महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेचे जनक आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापतीपद अठरा वर्षे सांभाळणारे ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्यसैनिक, तत्त्वचिंतक विठ्ठल सखाराम तथा वि.स. पागे यांची आज पुण्यतिथी. त्यांच्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते.

वि.स. पागे यांचा जन्म २१ जुलै १९१० रोजी झाला. वकील, समाजसेवक, राजकारणी, लोकप्रतिनिधी, चिंतक, अर्थव्यवस्थेचे अभ्यासक आणि विश्लेषण करून उपाय सुचविणारे प्रशासक अशी त्यांची अनेक रूपे होती.

त्याशिवाय संत वाङ्मयाचा आणि संस्कृतचा गाढा अभ्यास हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेच वैशिष्ट्य होते. अठरा वर्षे विधान परिषदेचे सभापतीपद सांभाळणे आणि तेही कोणत्याही अपवादाचा किंवा प्रवादाचा विषय न होता सांभाळणे ही कामगिरी फार थोड्या लोकांना जमू शकते. विशेषत: पागे यांच्या कारकिर्दीत अनेक मातब्बर नेते सभागृहाचे सदस्य होते. अशा वेळी पागे अतिशय शांतपणे, कायदे आणि नियमांचा अर्थ लावून सुस्पष्ट निर्णय देत, की तो आपोआपच सर्वांना मान्य ठरत असे.

वि.स. पागे हे उत्तम दर्जाचे कवी, नाटककार होते. १९३२-३३च्या सुमारास त्यांनी ‘वीर मोहन’ नावाचे नाटक लिहिले होते. ‘निवडणुकीचा नारळ’ नावाची नाटिका लिहिली होती. त्याचप्रमाणे ‘पहाटेची नौबत’ आणि ‘अमरपक्षी’ या नावाचे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. १६ मार्च १९९० रोजी वि.स. पागे यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# मोटोरोला एज ७० फ्यूजन भारतात लॉन्च

टेक कंपनी मोटोरोलाने ६ मार्च रोजी भारतीय बाजारात आपला एज ७० सिरीजचा नवीन स्मार्टफोन मोटोरोला एज ७० फ्यूजन लॉन्च केला आहे. हा फोन लांब बॅटरी लाइफसह प्रीमियम डिस्प्ले आणि दमदार परफॉर्मन्स शोधणाऱ्या युजर्ससाठी करण्यात आला आहे.



फोनमध्ये ५०एमपी सोनी कॅमेरा आणि ७०००mah बॅटरी देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, यात मिलिटरी ग्रेड बॉडीसह IP69 प्रोटेक्शन देखील मिळेल. फोन तीन व्हेरिएंटमध्ये आला आहे. याची सुरुवातीची किंमत २६,९९९ रुपये आहे. सुरुवातीच्या सेलमध्ये फोनवर २ हजार रुपयांची सूट मिळेल.

डिझाइन : मिलिटरी ग्रेड बॉडी आणि क्वाड-कव्हर्ड स्क्रीन

बिल्ड क्वालिटी: फोनला MIL-STD ८१०H मिलिटरी ग्रेड सर्टिफिकेशन मिळाले आहे, जे त्याला पडण्यापासून वाचवते. याला IP68 आणि IP69 ची रेटिंग मिळाली आहे, म्हणजेच, हे पाण्यातही सुरक्षित राहू शकते.

फ्रंट डिझाइन : फोनच्या फ्रंटमध्ये क्वाड-कव्हर्ड स्क्रीन आहे, ज्यामध्ये बेझल्स नगण्य आहेत. सेल्फी कॅमेऱ्यासाठी वरच्या मध्यभागी एक लहान पंच-होल दिले आहे. कव्हर्ड कडांमुळे, फोन हातात धरल्यावर खूप प्रीमियम आणि स्लिम वाटतो.

स्पेसिफिकेशन्स : शक्तिशाली प्रोसेसर आणि AIचा सपोर्ट

डिस्प्ले : यात ६.८-इंचची 1.5K एक्सट्रीम एमोलेड स्क्रीन आहे. ही 144Hz रिफ्रेश रेट आणि ५२०० निट्सच्या पीक ब्राइटनेसला सपोर्ट करते. डिस्प्लेच्या संरक्षणासाठी कॉर्निंग गोरिल्ला ग्लास 7i लावण्यात आला आहे. यात ’स्मार्ट वॉटर टच’ फीचर देखील आहे, ज्यामुळे हात ओले असतानाही टच काम करतो.

कॅमेरा : फोटोग्राफीसाठी फोनच्या मागील पॅनलवर ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे. यात मुख्य कॅमेरा 50MP सोनी LYT710 सेन्सर आहे, जो ऑप्टिकल इमेज स्टेबिलायझेशन (OIS) सह येतो. त्यासोबत 13MP चा अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स आणि लाइट सेन्सर देण्यात आला आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी समोर 32MP चा कॅमेरा आहे.

बॅटरी आणि चार्जिंग : फोनमध्ये 7000mahची बॅटरी देण्यात आली आहे.

# आज राष्ट्रीय लसीकरण दिवस

**निमित्त**

रोगांपासून दूर ठेवण्यासाठी लसीकरण महत्वाचे आहे. राष्ट्रीय लसीकरण दिवस २०२३ जवळ येत आहे, चला तर मग आपण भारतातील या दिवसाचा इतिहास आणि महत्त्व पाहूया. दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. सार्वजनिक आरोग्यामध्ये लसीकरणाचे महत्त्व सांगण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी १९९५मध्ये भारतात पहिला तोंडावाटे पोलिओ लसीकरण डोस देण्यात आला. यापुढे दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय लसीकरण दिन म्हणून पाळला जातो.

संसर्गजन्य आजारांची वाढ रोखण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. हे हस्तांतरणीय रोगांचे नियंत्रण आणि निर्मूलन करण्याचे साधन म्हणून काम करते. सामान्य लोकांचे आरोग्य सुधारणे आणि निरोगी राहणीमानाच्या दृष्टीने त्यांचे दर्जा उंचावणे हे महत्त्वाचे आहे. आपण आज या लेखामध्ये लसीकरणाच्या इतिहासापासून सुरू होणाऱ्या काही महत्त्वाच्या तपशीलांबद्दल पाहणार आहोत.

सराव म्हणून लसीकरणाचा शेकडो वर्षांपूर्वीचा इतिहास १७००च्या दशकात आहे. एडवर्ड जेनर, एक इंग्लिश चिकित्सक आणि शास्त्रज्ञ ही अशी व्यक्ती आहे ज्यांना



लसींचे संस्थापक मानले जाते. १७९६मध्ये त्यांनी १३ वर्षांच्या मुलाचे लसीकरण करण्यासाठी काउपॉक्सविरुद्ध लस वापरली. त्यांनी चेचकविरुद्ध प्रतिकारशक्ती प्रस्थापित करण्यासाठीदेखील समर्थन केले आणि चेचकविरुद्ध पहिली लस १७९८मध्ये विकसित केली गेली.

१८व्या आणि १९व्या शतकात चेचकविरुद्ध मोठ्या प्रमाणात लसीकरण चालू राहिले आणि १९७९मध्ये मोठ्या प्रमाणात लसीकरणामुळे चेचकांचे उच्चाटन झाले. त्याचप्रमाणे लुई पाश्चर यांनी केलेल्या प्रयोगांमुळे १९व्या शतकात कॉलराविरूद्ध लसीकरण विकसित करण्यात मदत झाली. त्याचप्रमाणे नंतरच्या काळात वेगवेगळ्या इतर लसी विकसित केल्या गेल्या.

१९४०च्या दशकात, वैज्ञानिक ज्ञानाच्या आविष्कारांमुळे मोठ्या प्रमाणावर लसीचे उत्पादन झाले. १९६०च्या दरम्यान, गोवर, गालगुंड आणि रुबेलाविरुद्ध लस शोधण्यात आली, ज्याला चचठ लस म्हणून ओळखले जात असे. गेल्या काही वर्षांमध्ये, आणखी महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या ज्यामुळे लसींच्या जगात प्रगत लसी तंत्रज्ञानाचा समावेश करून मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. कोविड-१९ लसींचा नुकताच झालेला विकास आणि या रोगाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम हे लसीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाढीचे उदाहरण आहे.

१६ मार्च राष्ट्रीय लसीकरण दिनी, तुमचा जन्म झाला त्या दिवसापासून तुम्हाला आतापर्यंत मिळालेल्या सर्व लसी पाहण्यासाठी तुम्ही लसीकरणावरील तुमच्या नोंदी पाहू शकता. या लसींनी तुम्हाला जीवनातील अनेक घातक आजारांपासून वाचवले आहे. तथापि, कोणत्याही कारणास्तव तुम्ही चुकलेले कोणतेही लसीकरण असल्यास किंवा कोणत्याही आरोग्य स्थितीमुळे तुम्हाला लसीकरणाची आवश्यकता असल्यास, तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी भेटीची वेळ ठरवू शकता आणि डोस मिळवू शकता.तुम्ही लोकांना लसीकरणाच्या योग्य वापराबद्दल जागरूक करण्यासाठी सोशल मीडियावर संदेश पसरवू शकता. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# त्वचेचे आरोग्य जपणेही अतिशय महत्त्वाचे!

सौंदर्य टिकवून ठेवायचे असेल तर सातत्य राखणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये विविध ट्रीटमेंट असोत, सनस्क्रीन आणि मॉइश्चरायझर असो, यांच्या बरोबरीने निरोगी राहण्यासाठी योग्य आहार आणि विहार अतिशय महत्त्वाचे आहेत.

प्रत्येक रुग्ण डॉक्टरांना पथ्य-पाण्याबद्दल विचारतो. एक गोष्ट लक्षात ठेवा विशिष्ट पदार्थ भरपूर प्रमाणात खाल्ल्याने आपण लगेच तरुण दिसू शकत नाही, परंतु या पदार्थांचे नियमित सेवन वार्धक्यातदेखील छान दिसण्यात व छान वाटण्यात मदत करते.



ग्रीन टी, तेलकट मासे, डार्क चॉकलेट, विविध भाज्या, आळशीच्या बिया, सर्व प्रकारची फळे विशेषतः डाळिंब, केळी आणि लिंबूवर्गीय फळे, व्होकॅडो, ऑलिव्ह ऑइल हे काही महत्त्वाचे अन्नघटक आहेत.

ग्रीन टीचे काही अधिक फायदे आहेत. तो स्ट्राँग अँटीऑक्सिडंट आहे. ग्रीन टी रक्त पातळ करते, जे आपल्या हृदयासाठी फायदेशीर आहे, परंतु छोट्याशा शस्त्रक्रियेतसुद्धा जास्त रक्तस्त्राव करू शकते.

रावस, सुरमई आणि बांगडा यासारख्या तेलकट माशांमध्ये ओमेगा थ्री फॅटी सिड भरपूर प्रमाणात असतात. हे सिड त्वचेवरील तेलकट आवरण टिकवून ठेवते, ज्यायोगे त्वचा मुलायम राहते आणि सुरकुत्या कमी प्रमाणात तयार होतात. त्वचा शुष्क न झाल्यामुळे त्याच्यावर बारीक चिरा पडत नाहीत व अॅलर्जीचे प्रमाण आटोक्यात राहते. या माशांमधून प्रथिनांचा पुरवठा भरपूर होतो, ज्याच्या उपयोगाने त्वचेमध्ये कोलॅजेन आणि इलास्टिन या तंतूंची नवनिर्मिती होत राहते. हे दोन तंतू त्वचेला नितळ, लवचिक. मुलायम व गुबगुबीत करतात. माशांमध्ये सेलेनियम हे मूलद्रव्य भरपूर प्रमाणात असते. हे द्रव्य डीएनएच्या निर्मितीला आवश्यक असते, ज्यामुळे त्वचा पेशींना होणारी इजा रोखून नवीन पेशी निर्माण होतात.

सर्व प्रकारच्या भाज्यांमध्ये वेगवेगळी अँटीऑक्सिडेंट असतात. शिवाय त्यातील तंतूमय पदार्थ मोठ्या आतड्यातील लॅक्टोबॅसिलाय या चांगल्या जीवाणूंच्या वाढीला मदत करतात. हे जीवाणू त्वचेचे आरोग्य राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.

संत्री, मोसंबी, लिंबे आणि पेरू ही फळे म्हणजे क जीवनसत्वाची कोठारेच आहेत. त्यांच्यामुळे अतिनील किरणांचा दुष्परिणाम रोखण्याबरोबरच त्वचेवरील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते.

# खासदार तटकरेंचा आमदार थोरवेंवर तब्बल ६५ कोटींचा अब्रूनुकसानीचा दावा

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील राजकारणाला नव्या वळणावर आणणारी घटना घडली असून रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात तब्बल ६५ कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा माणगाव सत्र न्यायालयात दाखल केला आहे. या दाव्यामुळे रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून आरोप-प्रत्यारोपांची लढत आता न्यायालयीन पातळीवर पोहचली आहे.

खोपोली नगरपालिका निवडणुकीनंतर २६ डिसेंबर रोजी शिवसैनिक मंगेश काळोखे यांची निर्घृण हत्या झाली होती. ते शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. या घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती आणि राजकीय वातावरण ढवळून निघाले होते.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आमदार महेंद्र थोरवे यांनी एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत खासदार सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या आरोपांमुळे आपली राजकीय प्रतिमा मलिन झाली आणि जनतेत चुकीचा संदेश गेला असा दावा करत तटकरे यांनी थोरवे यांच्या विरोधात ६५ कोटी रुपयांचा अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला आहे.




या प्रकरणाची पहिली सुनावणी माणगाव सत्र न्यायालयात पार पडली असून पुढील सुनावणी २४ एप्रिल रोजी होणार आहे. तटकरे यांचे वकील ॲड. प्रदीप पाटील यांनी याबाबत माहिती दिली.

दरम्यान, या दाव्यामुळे रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. एकीकडे हत्या प्रकरणामुळे निर्माण झालेली संवेदनशील परिस्थिती आणि दुसरीकडे राजकीय नेत्यांमधील थेट न्यायालयीन संघर्ष यामुळे जिल्ह्यातील सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये तीव्र राजकीय ध्रुवीकरण दिसून येत आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, या प्रकरणामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. आरोप-प्रत्यारोपांची लढत आता न्यायालयात पोहचल्याने दोन्ही बाजूंकडून राजकीय रणनीती अधिक आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या या दाव्यामुळे एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी बेछूट आणि बिनबुडाचे निराधार आरोप-प्रत्यारोप करुन राजकीय चर्चेत किंवा समाज माध्यमातून खोटी प्रसिद्धी मिळवण्यासाठी आटापिटा करून फुशारक्या मारणार्या आणि बेताल वक्तव्ये करणारे नेते आणि गाव पुढार्यांना निश्चितच पायबंद बसेल अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

खासदार सुनील तटकरे हा अब्रुनुकसानीचा दावा दाखल करुन एकाच दगडात अनेक पक्षी मारले आहेत अशी चर्चा आहे. असे असले तरी खासदार सुनील तटकरे यांनी हा दावा दाखल करुन योग्यच केले आहे, असे कार्यकर्त्यांनी सांगितले.

# भुयारी मार्ग ठेकेदाराच्या ऑफिसमध्ये दारू पिणाऱ्यांची मारहाण

## चौघांविरोधात गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कातळी भोगाव गावाच्या हद्दीत भुयारी मार्गाच्या शिंदे डेव्हलपर्स ठेकेदाराच्या ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये फिर्यादी व सहकारी यांना दारू पिल्यानंतर दारूची बाटली फेकू नका, काचा लागतील असे सांगितल्याच्या कारणावरून चार आरोपींनी मारहाण केल्याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दि.११ मार्च २०२६ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास भोगाव गावचे हद्दीतील कातळी भोगाव येथील शिंदे डेव्हलपर्सच्या ऑफिसच्या कॅटीनमध्ये साक्षीदार अनुज कुमार यादव व दशरथ डांगे (दोघेही रा. भोगाव, ता.पोलादपूर) हे पाणी आणण्यासाठी शिंदे डेव्हलपर्सच्या ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये गेले असता तेथे आरोपी सागर घाडगे (रा. पोलादपूर), केतन घाडगे (रा. महाबळेश्वर) प्रतिक कांबळे व प्रतिक घाडगे (दोघे रा. महाबळेश्वर) हे दारू पिण्याकरीता बसले होते.

यावेळी साक्षीदार यांनी त्यांना दारूची बॉटल फेकू नका. मला जाऊ द्या. नाहीतर बॉटलच्या काचा मला लागतील. असे सांगितल्यावर आरोपींना राग येऊन त्यांनी त्याला तु कोण रे,असा सवाल करीत आरोपी यांनी दोन्ही साक्षीदारांना हाताबुक्यांनी मारहाण केला.

याप्रसंगी तेथे आलेले फिर्यादी सुशील शिवणकर यांनीदेखील आरोपी यांना'तुम्ही कशाला यांना मारलेत' विचारले असता आरोपींनी फिर्यादी यांना प्लास्टिकच्या काठीने, हाताबुक्यांनी, लाथांनी मारहाण करून शिवीगाळी, दमदाटी करून त्या झटापटीत फिर्यादी यांची गळयातील सोन्याची चैन कोठेतरी पडुन गहाळ झाली आहे.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

# राष्ट्रीय लोक अदालतीत ८४,८१७ प्रकरणे निकाली

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रलंबित तसेच दाखलपूर्व खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि वाद सामोपचाराने मिटावेत या उद्देशाने रायगड जिल्ह्यात शनिवारी ( दि. १४) राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत एकूण १,४१,५१४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यामध्ये १,२२,५१० वादपूर्व प्रकरणे आणि १९,००४ प्रलंबित प्रकरणे होती. यापैकी ७८,३२४ वादपूर्व प्रकरणे आणि ६,४९३ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ८४,८१७ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये ३६ कोटी ४६ लाख ६१ हजार ४२९ रुपयांची तडजोड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तेजस्विनी म. निराळे यांनी दिली.

राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र द. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अलिबाग येथील न्यायिक अधिकारी, वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड प्रसाद पाटील, सचिव ॲड अमित देशमुख तसेच दृकश्राव्य माध्यमातून रायगड जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी, तालुका वकील संघटनेचे वकील आणि पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशानुसार देशभर लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

**सहा जोडप्यांचा संसार पुन्हा जुळला**

या लोक अदालतीत रायगड जिल्ह्यातील सहा जोडप्यांचे कौटुंबिक वाद सामंजस्याने मिटवण्यात यश आले. यात पेण येथील १, पाली येथील १, पनवेल येथील २ आणि अलिबाग येथील २ जोडप्यांचा समावेश आहे. त्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाल्याबद्दल प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र द. सावंत यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मोटार अपघात प्रकरणांत ५.६८ कोटींची नुकसानभरपाईजिल्ह्यातील ६० मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड होऊन संबंधित पक्षकारांना ५ कोटी ६८ लाख ७९ हजार रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत एकूण २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. काही प्रकरणांचा निपटारा व्हिडिओ कॉलच्या माध्यमातूनही करण्यात आला.ही लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील, न्यायालयीन कर्मचारी, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच सर्व पोलीस कर्मचारी आणि पक्षकार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र द. सावंत यांनी सर्वांचे आभार मानले.

# वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात उष:काल फाउंडेशनचा पुरस्कार वितरण सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उष:काल फाउंडेशन उतेखोल – माणगाव या सेवाभावी संस्थेतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान सोहळा वडघर येथील सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकात रविवार दि.१५ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष व विप्ला फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद निगुडकर यांनी उष:काल फाउंडेशनचे कार्य मोठे व कौतुकास्पद असल्याचे गौरवद्गार काढले.



आज समाजात विविध क्षेत्रात अनेकजण आपल्या परीने सेवाभावी वृत्तीने काम करीत असतात. अशा मान्यवर व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे यासाठी सेवाभावी संस्था संघटना पुढे येऊन त्यांच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करीत असतात. हेच कार्य उष:काल फाउंडेशन उतेखोल माणगाव हे सेवाभावी फाउंडेशन गेली चार वर्षांपासून करीत आहे.

उष:काल हा सार्वजनिक स्वरूपाचा न्यास आहे. या फाऊंडेशनचे संस्थापक विश्वस्थ नामदेव शिंदे व त्यांचे कुटुंबीय स्वखर्चाने विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार वितरण व शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच अन्य समाजउपयोगी कार्य सातत्याने करीत असतात. नामदेव शिंदे हे आरोग्य खात्यातून निवृत्त झाल्यावर त्यांनी समाजकरणावर विशेष भर दिला.

नामदेव शिंदे हे आपली पत्नी कै.उषा शिंदे व भाऊ कै. आदिप शिंदे यांच्या स्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. त्यापैकीच एक असणारा मान्यवर व्यक्तींना पुरस्कार वितरण सोहळा आहे.

या उष:काल न्यासातर्फे आरोग्य,शिक्षण आणि सामाजिक सेवा क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान सोहळा सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकात स्मारकाचे अध्यक्ष प्रमोद निगुडकर,सचिव राजेश कुलकर्णी ,फाउंडेशनचे संस्थापक विश्वस्थ नामदेव शिंदे यांच्याहस्ते व शिंदे कुटुंबीय,मित्रपरिवार,विविध क्षेत्रातील मान्यवर,विद्यार्थी यांच्या उपस्थित उत्साहात संपन्न झाला.

# खालापूर महसूलमार्फत ७४७ दाखल्यांचे आदिवासी समाजाला वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक एकच्या अंमलबजावणीत खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या टीमने बाजी मारली असून आदिवासी समाजाला जिल्ह्यात सर्वाधिक ७४७ दाखले शिबिरात देण्याची रेकॉर्ड ब्रेक कामगिरी करून दाखवली आहे.



खालापूर तालुक्यामध्ये ७ मार्च ते १५ मे दरम्यान मंडळ स्तरावरती खालापूर तालुक्यामध्ये एकूण सात शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.शनिवारी ग्रुप ग्रामपंचायत सभागृह, साजगाव येथे आयोजित शिबिरात नागरिक व लोकप्रतिनिधींना सदर अभियाना बाबत तहसीलदार अभय चव्हाण यांनी मार्गदर्शन केले तसेच उपस्थित इतर प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती सदर अभियानात देण्यात आली.

सदर अभियानात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा, ८ अ वाटप ,उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी आदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा (४२ ते ४७) कलम सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांना दाखले वाटप, तुकडेबंदी कायदा सुधारणा, पाणंद रस्ता, सर्वांसाठी घरे पट्टेवाटप, ग्रीस्टॅग नोंदणी, पी एम किसान नोंदणी, कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत करणे सेवा देण्यात आल्या. तसेच भूमी अभिलेख कार्यालया तर्फे डिजिटल सेवांचा प्रसार व जनजागृती , नगर भूमापन गावठाण भूमापन व स्वामित्व अंतर्गत फेरफार प्रकरणे, भूसंपादन व अकृषीक प्रकरणात कमी जास्त पत्रक तयार करणे, ई-मोजणी २.० प्रणाली, महाभुमी पोर्टल विषयी जनजागृती, तुकडे बंदी कायद्यामधील बदल बाबत माहिती, जनसंपर्क व प्रात्यक्षिक उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी उपसंचालक भूमी अभिलेख कोकण प्रदेश अनिल माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रायगड सुनील इंदलकर, तहसीलदार अभय चव्हाण, उपअधीक्षक भूमी अभिलेख प्रमोद जरग, नायब तहसीलदार सुधाकर राठोड लोकप्रतिनिधी जिल्हा परिषद सदस्य रायगड रेश्मा पाटील, पंचायत समिती सदस्य देवयानी देशमुख, सरपंच विनोद खवळे, सरपंच चावणी, बाळासाहेब आखाडे, रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य नरेश पाटील, सुनील पाटील, मंडळ अधिकारी भरत सावंत, सहाय्यक महसूल अधिकारी, अशोक सुसलादे महसूल, सहाय्यक अमोल वाघ, स्वाती पवार, आकाश माने, अल्पना फेगडे, विद्या हिरवे, ग्राम महसूल अधिकारी रनजीत कवडे, दत्ता करचे, गणेश कोकाटे, वैशाली भावा, जयश्री मोरे, कोतवाल,टाटा स्टील अंतर्गत अश्वपरी संघटना अध्यक्ष इशिका शेलार, सामाजिक कार्यकर्ते आदिवासी संघटना उरण डव्होकेट राजेंद्र मढवी, सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, आधार कार्ड केंद्र चालक, इतर प्रशासकीय विभागातील कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

# इफ्तार पार्टीमुळे एकोप्याचे दर्शन : ॲड.राजीव साबळे

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

इफ्तार पार्टीमुळे हिंदू-मुस्लिम समाजातील स्नेहभाव अधिक प्रमाणात वृद्धिंगत होऊन सामाजिक एकोप्याचे दर्शन घडते असे प्रतिपादन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड. राजीव साबळे यांनी माणगाव येथील इफ्तार पार्टी कार्यक्रमात प्रसार माध्यमांजवळ बोलताना व्यक्त करून येणाऱ्या रमजान ईदच्या मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. या इफ्तार पार्टी कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे,माजी आमदार अनिकेत तटकरे यांची उपस्थिती होती.



सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरु असून या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटे लवकर उठून रोजा(उपवास) धरतात.सायंकाळी मगरीबच्या बांगीबरोबर हा रोजा सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात. या पवित्र रमजान महिन्यात माणगाव तालुक्यातील मुस्लिम बांधवाना इफ्तार पार्टीच्या निमित्ताने एकत्र आणण्याचे काम अँड.राजीव अशोक साबळे व सहकाऱ्यांनी केले.त्यासाठी लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान,द.ग.तटकरे महाविद्यालय,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१४ मार्च रोजी सायंकाळी द.ग.तटकरे महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते.

यावेळी माणगाव नगरपंचायत हद्दीतील तसेच तालुक्यातील विविध गावातील मुस्लिम बांधव मोठ्यासंख्येने या इफ्तार पार्टीत सहभागी झाले होते. यावेळी अँड.राजीव साबळे,नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, युवानेते वैभव साबळे उपस्थितांचे स्वागत केले.

# श्रीवर्धन बीचवर अतिक्रमणाचा सुळसुळाट; पर्यटकांच्या सुरक्षेशी खेळ

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन या ऐतिहासिक आणि निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्याची ओळख पर्यटनासाठी राज्यभर आहे. मात्र सध्या हा किनारा अनधिकृत अतिक्रमणाच्या गंभीर समस्येत अडकला असून प्रशासनाच्या कथित दुर्लक्षामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे.

समुद्रकिनाऱ्याच्या परिसरात वन विभाग आणि नगर परिषदेच्या मालकीच्या जागांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत स्टॉल्स उभे राहिले आहेत. काही ठिकाणी तर पक्के तंबू, तात्पुरती हॉटेलिंग व्यवस्था आणि खाद्यपदार्थांची दुकाने सुरू करण्यात आली आहेत. स्थानिकांच्या मते, या सर्व प्रकारामुळे श्रीवर्धनच्या पर्यटन प्रतिमेलाच तडा जाऊ लागला आहे. 'मनाई'चे फलक, पण प्रत्यक्षात मोकळे राननगरपरिषदेने समुद्रकिनाऱ्यावर अनेक ठिकाणी येथे स्टॉल लावण्यास सक्त मनाई आहे असे स्पष्ट फलक लावले आहेत.परंतु प्रत्यक्षात त्या फलकांच्या अगदी शेजारीच अनधिकृत स्टॉल्स उभे राहिल्याचे दृश्य पाहायला मिळते.शासकीय विश्रामगृह परिसर, स्मशानभूमीच्या जवळचा भाग, तसेच 'फेस्टिवल बीच' परिसरात अनेक स्टॉलधारकांनी आपला व्यवसाय थाटला आहे.धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरच जेवणावळीया संपूर्ण प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे समुद्राच्या लाटांपासून संरक्षणासाठी उभारलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरच पर्यटकांना बसवून जेवण वाढले जात आहे. समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षा आणि पर्यावरण संरक्षणासाठी बांधलेल्या या संरचनेचा वापर आता हॉटेलिंगसाठी होत असल्याने स्थानिक नागरिक संताप व्यक्त करत आहेत.याठिकाणी ना फूड लायसन्स, ना आरोग्य विभागाची परवानगी, ना अग्निशमन सुरक्षेची व्यवस्था – अशा परिस्थितीत पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पर्यटकांच्या जिवाशी खेळ? अनेक स्टॉल्समध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचेही पर्यटकांकडून सांगितले जात आहे. अन्नपदार्थ उघड्यावर ठेवले जात आहेत, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही व्यवस्था नाही, आणि स्वच्छ पाण्याचीही सुविधा नसल्याचे दिसून येत आहे.या परिस्थितीत एखादी दुर्घटना किंवा आरोग्यविषयक समस्या उद्भवल्यास जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिक शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून व्यवसाय करतात. जीएसटी भरतात आणि सर्व आवश्यक परवाने घेतात.मात्र त्याचवेळी कोणतीही कागदपत्रे नसलेले अनधिकृत स्टॉलधारक मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करत असल्याने प्रामाणिक व्यावसायिकांमध्ये असंतोष वाढत आहे.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८६/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्र ... नावडे येथील लेव्हल क्रॉसिंग क्र. १२-ए वरील रोड ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) दुरुस्तीची कामे करणे. | ₹ १७,४०,४६,१७५.०० |
| २ | बोरीवली औद्योगिक क्षेत्र... नव्याने तयार करण्यात आलेल्या भूखंडांसाठी सिमेंट कॉंक्रेटचा रस्ता, आर.सी.सी. गटार व नाला बांधणेबाबत. | ₹ ९,४३,३५,२७३.०० |
| ३ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती... पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर नाले व रस्त्याच्या कडील गटारांची साफसफाई तसेच इंजिनिअरिंग झोनमधील बांधकाम केलेल्या गटारांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई व अनुषंगिक कामे करणे. | ₹ २,३१,१८,२४२.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सामायिक सांडपाणी केंद्रा मधील वापरात नसलेल्या सिमेंट कॉंक्रेटच्या यु ए एसबी टाकीची दुरुस्ती व मजबुतीकरण करून सांडपाणी साठविण्याकरिता उपयोगात आणणे तसेच कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३,६२,४५,०१०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २३/०३/२०२६ ते दिनांक १६/०४/२०२६ पर्यंत व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २३/०३/२०२६ ते दिनांक ०६/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र.१ व २ वरील कामांबाबत दिनांक ३०/०३/२०२६ पूर्वी व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक २७/०३/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत दिनांक ०७/०४/२०२६ पासून व अ.क्र. ३ व ४ वरील कामांबाबत दिनांक ०१/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# रेवदंड्यात स्वच्छता अभियान

## १४.६ टन कचरा हटवला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पद्मश्री व महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. दत्तात्रेय उर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्यामार्फत १५ मार्च २०२६ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



या स्वच्छता मोहिमेत साळाव तपासणी नाका ते नागाव शास्त्रीनगर थांबा या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर साफसफाई करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा साचलेला कचरा, झाडझुडप व घाण काढून परिसर स्वच्छ करण्यात आला.

अभियानादरम्यान एकूण १४.६ टन कचरा हटविण्यात आला असून या कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत विशेष म्हणजे या उपक्रमात प्रतिष्ठानचे सदस्य श्रमदानासाठी उपस्थित होते तसेच स्थानिक ग्रामस्थांनीही सहभाग नोंदवाला एकूण ५१६ सदस्य उपस्थित राहून श्रमदान करण्यात आले.

कचरा व घाणीमुळे निर्माण होणारी दुर्गंधी, रोगराई तसेच डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अशा प्रकारच्या स्वच्छता मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वच्छतेविषयी ठाम संकल्पना निर्माण व्हावी आणि परिसर स्वच्छ व निरोगी राहावा, या उद्देशाने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे, असे उपक्रम वेळोवेळी राबविण्यात येत असतात.

# घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केल्यास कारवाईचा इशारा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सध्या मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसच्या तुटवड्याबाबत काही ठिकाणी अफवा पसरत असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि, संपूर्ण जिल्ह्यातील घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असून कोणत्याही प्रकारचा तुटवडा निर्माण झालेला नाही. घरगुती वापरासाठी वितरित करण्यात येणारा एलपीजी गॅस केवळ घरगुती कारणांसाठीच वापरणे बंधनकारक आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक अथवा इतर अनधिकृत वापर होत असल्याचे आढळून आल्यास संबंधित व्यक्ती किंवा आस्थापनांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार साठेबाजी व काळाबाजार रोखण्याकरीता घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दोन बुकिंगमध्ये किमान २५ दिवसांचा कालावधी आवश्यक करण्यात आला आहे. त्यामुळे एका सिलेंडरचे वितरण झाल्यानंतर २५ दिवस पूर्ण झाल्यानंतरच पुढील सिलेंडरचे बुकिंग करता येईल.

रायगड जिल्ह्यात घरगुती गॅस सिलेंडर चा पुरवठा सुरळीत असल्याने घरगुती गॅसच्या पुरवठ्याबाबत नागरीकांनी चिंताग्रस्त होण्याची आवश्यकता नाही. नागरिकांनी घरगुती गॅसचा अनावश्यक साठा करून ठेवू नये तसेच अफवांवर विश्वास ठेवून घाईगडबडीत गॅस घेण्याचा प्रयत्न करू नये. घरगुती गॅसच्या पुरवठ्याबाबत काही तक्रार असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्षातील ०२१४१-२२७४५२या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

घरगुती गॅसचा पुरवठा नियमितपणे सुरू असून नागरिकांनी संयम राखावा व प्रशासनास सहकार्य करावे. रायगड जिल्ह्यात घरगुती गॅसचा तुटवडा नसल्याने नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# बसने चिरडल्याने पादचाऱ्याचा जागीच मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून बस मागे घेत असताना पायी चालत जाणाऱ्या व्यक्तीला बसची धडक बसून गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील चावणे गावाच्या हद्दीत, कॅमलिन कंपनीच्या गेट क्रमांक १ समोर घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रहमान अब्दुल खान (वय ६१, रा. म्हाडा कॉलनी, गोवंडी, मुंबई) हे कॅमलिन कंपनीच्या गेट क्रमांक १ समोरून पायी चालत जात असताना एमएच ४८ के/०६८२ (एमएच ४८ के ०६८२) क्रमांकाची बस चालक भोलानाथ सुजित लाल यादव (वय ४४, रा. आसूडगाव, ता. पनवेल) हा बस मागे घेत होता, मात्र रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने बसचा जोरदार धक्का खान यांना बसला. या धडकेत बसचा पाठीमागील टायर त्यांच्या कमरेवरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले.

जखमी अवस्थेत त्यांना तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी अजय मनोहर राठोड (रा. वावेघर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रसायनी पोलीस ठाण्यात बसचालक भोलानाथ यादव याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), ३२५ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुरेश व्ही. पवार करीत आहेत.

# माणगावमध्ये प्रशासकीय इमारत, सोलार हायमास्टचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या विकासासाठी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करणे ही आपली जबाबदारी असून ती लवकरात लवकर प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे ठाम आश्वासन खासदार सुनील तटकरे यांनी दिले.



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे तसेच शहरातील हायमास्ट आणि सौर पथदिव्यांचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या सोहळ्यात बोलताना त्यांनी माणगावच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅपच नागरिकांसमोर मांडला. खा.तटकरे म्हणाले की, माणगाव आणि इंदापूर परिसरातील नागरिकांची दीर्घकाळापासूनची मागणी असलेला बायपास रस्ता आता अंतिम टप्प्यात असून ३१ मेपर्यंत मुंबई आणि कोकणातील प्रवाशांसाठी तो खुला होईल. या रस्त्यामुळे वाहतुकीचा ताण कमी होऊन हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

याशिवाय माणगाव आणि इंदापूर येथे पर्यायी मार्ग उभारण्यासाठी अजितदादा पवार यांनी पूर्वीच २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्या निधीच्या आधारे आवश्यक कामे पूर्ण करण्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. माणगाव शहराचा भविष्यातील विकास लक्षात घेऊन संपूर्ण विकास आराखडा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सहकार्याने मंजूर करून घेतला जाईल, असे सांगत त्यांनी लवकरच भुयारी गटार योजनेलाही मंजुरी मिळणार असल्याची माहिती दिली. रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगावला आधुनिक, स्वच्छ आणि सुबक शहर म्हणून विकसित करण्याचा आपला संकल्प असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्रातही माणगाव झपाट्याने पुढे जात असल्याचा उल्लेख करत खासदार तटकरे यांनी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय, शिंदे सीबीएसई इंग्रजी शाळा तसेच श्रीमती गीता तटकरे नर्सिंग कॉलेज यांसारख्या शैक्षणिक सुविधाद्वारे तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची दालने खुली केली आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे समाजासाठी मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अस्लम राऊत आणि उपसभापती मनिषा मालोरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी खासदार तटकरे यांनी मुस्लिम समाजाला ईदच्या तर हिंदू बांधवांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात दोन्ही समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुधागडच्या जांभूळपाडा येथे महसूल समाधान शिबिर

## १५ विविध सेवांचा नागरिकांना लाभ

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाचा दुसरा टप्पा सुधागड तालुक्यात यशस्वीरीत्या पार पडला. महसूल विभागाच्या वतीने जांभूळपाडा येथे आयोजित या शिबिरात नागरिकांना विविध १५ महसूल सेवांचा लाभ देण्यात आला.



या शिबिरामध्ये सातबारा उताऱ्याची दुरुस्ती, फेरफार प्रकरणे, उत्पन्न दाखले, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, ई-मोजणी अर्ज, पीएम किसान नोंदणी, रेशन कार्ड तसेच ३२एम दाखले यांसारख्या सेवांचा समावेश होता. शेतकरी व नागरिकांनी या सेवांचा मोठ्या संख्येने लाभ घेतला.

कार्यक्रमास पेण-सुधागड मतदारसंघाचे आमदार रवीशेठ पाटील, उपजिल्हाधिकारी दिपा भोसले, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य शर्मिला बोडके, पाली पंचायत समितीचे सभापतीजागृती मानकर, पाली पंचायत समिती सदस्या प्रणिता राजेश परदेशी, माजी जिल्हा परिषद सदस्य रवी देशमुख,निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, साजिद शेख उपअधीक्षक भूमि अभिलेख सुधागड, नकुल पोळेकर निवडणूक नायब तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी सुधागड, सुखदेव वाढणकर पुरवठा निरीक्षण, रूपेश भादिकर जांभुळपाडा मंडळ अधिकार, अधिकारी, अंकुश साळवे मंडळ अधिकारी पेडली, गणेश साळुंखे मंडळ अधिकारी नांदगाव यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, भूमी अभिलेख कर्मचारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी दिपा भोसले, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड तसेच तहसीलदार उत्तम कुंभार यांनीही नागरिकांना मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान जिवंत सातबारा वाटप करण्यात आले तसेच उपस्थित मान्यवर व पत्रकारांचा सन्मानही करण्यात आला.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांसह विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कुशल मनुष्यबळ मिळण्याचे प्रशिक्षण केंद्र रोह्यात -खासदार सुनील तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

युपीएससी, एमपीएससी प्रशिक्षण केंद्राबरोबर कुशल मनुष्यबळ मिळण्याचे प्रशिक्षण केंद्र रोह्यात होत आहे. हे वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट प्रमुख उद्देश असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगत रोह्यात संगित कला अकादमी १५ मेला सुरू करणार असल्याचे सांगत क्रिडा प्रबोधिनी, ट्रिपल आयटीही सुरू करणार असल्याचे सांगितले.



वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट रोहा व युनिक अकॅडमी पुणे संचलित सुनील द. तटकरे स्पर्धा परीक्षा कॅडमी रोहा व आयईएसपी संस्थेचे लोकार्पण सोहळा निमित्ताने प.पु. पांडुरंग शास्त्री आठवले संकुल रोहा येथे आयोजित कार्यक्रमात खा.तटकरे बोलत होते.

यावेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, विश्वस्त वरदाताई तटकरे, वेदांती तटकरे, सभापती विजया पाशिलकर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, विजयराव मोरे, विनोद पाशिलकर, संतोष पोटफोडे, समीर शेडगे, मंगेश दांडेकर, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, संजय मांडलुस्कर, अहमद दर्जी, तुकाराम जाधव, महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, दिप्ती वीरकर, कपील हांडे आदी उपस्थित होते.

यावेळी ना.आदिती तटकरे यांनी कोकणातील मुला मुलींना चांगले शिक्षण मिळावे ही भावना या निमित्ताने जोपासल्याचे दिसून आले आहे. आयएस, आयपीएस आजी माजी अधिकारी यांचे मार्गदर्शन या ठिकाणी मिळणार आहे.या ॲकॅडमीचा पुरेपुर फायदा विद्यार्थ्यांनी उचलावे. या मातीतुन आयएस, आयपीएस घडावे त्यांचा सन्मान करण्याचा मानस व्यक्त केले.

वनश्री शेडगे यांनी सुर्वण क्षणाचा भाग होता आले हे मला भाग्य लाभले. ग्रामीण भागात होतकरू मुले आहेत. शहरात त्यांना जात येत नाही त्या विद्यार्थ्यांना या ठिकाणी प्रशिक्षण मिळणार आहे. कुठल्या शहरात अशा पध्दतीचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र कुठेच नसल्याचे सांगितले.

ज्ञानेश्वर खुटवल यांनी पुणे मुंबई येथे अशी अकॅडमी नाही. कोकण चा निकाल १०, १२ वीचा निकाल जास्त लागतो, पण पुढे मार्गदर्शन नसल्याने पुढे विद्यार्थी जात नाही. आज ही सुविधा या ठिकाणी उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन मिळणार आहे.

अकॅडमीचे तुकाराम जाधव यांनी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सुविधा या ठिकाणी मिळतील. चांगल्या दर्जाचे सोयी सुविधा या ठिकाणी आहेत. सर्व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन या ठिकाणी होणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थी या ठिकाणाहून प्रशासकीय सेवेत जातील, असा विश्वास व्यक्त केला.

गुर्पीत तन्ना यांनी २५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन नोकरी देणार असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना चांगले प्रशिक्षण देऊन उच्च पदावर जाण्यासाठी मार्गदर्शन करत असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रध्दा पवार, प्रियंका लोखंडे, तनुजा पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्या घोंडीदे यांनी तर आभार नागेश गवाणे यांनी मानले आहे.

# डोंगर-वाड्यांमधील विद्यार्थ्यांना ज्ञानाची वाट

## धामणसई शाळेचे आदर्श कार्य

**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील केंद्र पिंगळसई अंतर्गत येणारी रा.जि.प. शाळा धामणसई विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे पंचक्रोशीत आदर्श शाळा म्हणून ओळख निर्माण करत आहे. दुर्गम डोंगर आणि वाड्यांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत ही शाळा ज्ञानाची वाट उजळवत आहे.



या शाळेत धामणसई पंचक्रोशीतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील १०६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे चार किलोमीटर अंतरावरील डोंगरावर असलेल्या ईंदरदेव, तीन किलोमीटर अंतरावरील मालसई व मालसई वाडी, दोन किलोमीटर अंतरावरील धनगर वाडा, भैरवीनगर, सोनगाव व सोनगाव वाडी, तसेच एक किलोमीटर अंतरावरील गावठाण आणि अर्धा किलोमीटर अंतरावरील धामणसई वाडी, गरबाट वाडी येथील विद्यार्थी या शाळेत शिक्षणासाठी येतात. त्यामुळे एकूण पाच गावे व चार वाड्यांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत.

यू-डायस नोंदीनुसार येथे चार शिक्षक कार्यरत असले तरी पालकांच्या इच्छेनुसार गटशिक्षण अधिकारी धायगुडे मॅडम यांनी पाच शिक्षकांची व्यवस्था केली आहे. केंद्रप्रमुख साळी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ आणि धामणसई पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांच्या सहकार्याने वर्षभर वार्षिक स्नेहसंमेलन, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, दहीहंडी उत्सव, शारदोत्सव, गणेशोत्सव, प्रवेशोत्सव, जयंती-पुण्यतिथी, शैक्षणिक सहल, कला-कार्य अनुभव, निपुण भारत अभियान, परिसर भेट तसेच विद्यार्थ्यांचे वाढदिवस असे विविध उपक्रम उत्साहात पार पडतात.

सर्व उपक्रम मुख्याध्यापक जयेश भोईर यांच्या नेतृत्वाखाली अनिल नजन, कृष्णा नाकती, उषा मिसाळ व अर्चना हाके यांच्या समन्वयातून राबविले जात आहेत. महिनाभरापूर्वी बदली झालेले शशिकांत शेळके यांचाही या उपक्रमांमध्ये उल्लेखनीय सहभाग होता.

लोकसहभागातून यावर्षी विद्यार्थ्यांना सायकली, दप्तरे, वह्या, स्पोर्ट्स किट आणि विविध शैक्षणिक साहित्य असे जवळपास दोन लाख रुपयांपर्यंतचे साहित्य उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शाळेचे रूप अधिक आकर्षक आणि सुसज्ज होत आहे. आता शाळेसमोर धामणसई शाळेला ISO मानांकन मिळवून देण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

यासाठी सुदर्शन कंपनीचे व्यवस्थापन, रोटरी क्लब ऑफ रोहा, जि.प. सेस फंड आणि पंचायत समिती सेस फंड यांच्या सहकार्याने काम सुरू आहे. तसेच गटविकास अधिकारी शुभदा पाटील, कनिष्ठ सहाय्यक नरेश भोईर साहेब आणि जेई शेख साहेब यांच्या सहकार्याने हा उपक्रम लवकरच पूर्णत्वास जाणार असल्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शिक्षकांची मेहनत आणि ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे धामणसई शाळा उपक्रमशील आणि प्रगत शाळा म्हणून पंचक्रोशीत नवे उदाहरण निर्माण करत आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांना संगणक वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माणकीवली येथे आदिवासी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी संगणक वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. हा उपक्रम अश्वपरीस फाऊंडेशन यांच्या माध्यमातून पार पडला असून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश यामागे होता.



या उपक्रमासाठी MAX SPARE Co. यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सतीश पाटील उपस्थित होते. तसेच अश्वपरीस फाऊंडेशन तर्फे सुरेखा नायकर, निझाल खान, परिसा शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वसतिगृहातील पुळेकर, पांचाळ, नागवंशी, धायगुडे, राजेश डावरे तसेच शिक्षक वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी वसतिगृहाच्या आदिवासी विकास निरीक्षक सी. के. प्रजापती यांनी विद्यार्थ्यांना क्रांतिवीर बाबुराव पुल्लेसुर शेडमाके यांच्या शौर्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, १२ मार्च १८३३ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील किष्टापूर येथे जन्मलेले क्रांतिवीर बाबुराव शेडमाके हे १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील गोंडवाना प्रदेशातील एक थोर आदिवासी क्रांतिकारक होते.

मुख्याध्यापक विजय साळुंखे सर यांनी आपल्या मनोगतातून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. त्यांनी देशसेवा, शिस्त, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

अश्वपरीस फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष इशिका शेलार यांनी सांगितले की, समाजातील वंचित व गरजू घटकांपर्यंत शिक्षण व तंत्रज्ञानाच्या संधी पोहचवणे ही काळाची गरज आहे. यापुढेही या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येतील, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

# दक्षिण आफ्रिकेने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील पराभवाचा वचपा काढला

## दुरंगी मालिकेत न्यूझीलंडविरुद्ध विजयी सलामी

**माऊंट मांघनाई : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या सेमी फायनल लढतीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा उडवत दिमाखात फायनल गाठली होती. जिव्हारी लागणार्‍या या पराभवाचा वचपा द. आफ्रिकेने अवघ्या आठवडाभरात घेतला आहे. माऊंट मांघनाई येथे झालेल्या लढतीत आफ्रिकेने न्यूझीलंडचा डाव ९१ धावांतच गुंडाळला आणि त्यानंतर छोटेखानी लक्ष्य तीन विकेट्सच्या मोबदल्यात गाठत बाजी मारली.

दोन्ही संघांनी प्रमुख खेळाडूंना या मालिकेसाठी विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर मालिकेतील पाचपैकी तीनच सामने खेळणार आहे. रविवारी झालेल्या लढतीत सँटनरने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. खेळपट्टी गोलंदाजीसाठी पोषक आहे याचा अंदाज त्याला आला नाही. न्यूझीलंडचा डाव ९१ धावांतच



गडगडला. आफ्रिकेतर्फे पदार्पणवीर नकोबनी मोकेनाने तीन, तर गेराल्ड कुत्सिया, ओटनील बार्टमन आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेची सुरुवातही डळमळीत झाली. त्यानंतर कॉनर इस्टरह्यूझनने नाबाद ४५ धावांची खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा संघ दमदार फॉर्मात होता. सेमी फायनलच्या लढतीत त्यांच्यासमोर न्यूझीलंडचे आव्हान होते. प्राथमिक फेरीत त्यांनी न्यूझीलंडवर विजय मिळवला होता, मात्र कोलकाता इथे झालेल्या सेमी फायनलच्या लढतीत दक्षिण आफ्रिकेला धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवाचा वचपा काढण्याची संधी दक्षिण आफ्रिकेकडे होती. ती त्यांनी साधली.

दरम्यान, मालिकेच्या दुसर्‍या टप्पाय टॉम लॅथम न्यूझीलंड संघाचे नेतृत्व करणार आहे. तब्बल तीन वर्षांनंतर लॅथमचे टी-२० संघात पुनरामगन झाले आहे, तर न्यूझीलंडच्या कोचिंग टीमचा भाग असलेले जेकब ओरम आणि ल्यूक राँची हे पाकिस्तान सुपर लीगमधल्या इस्लामाबाद युनायटेड संघाचे प्रशिक्षकपद भूषवत असल्याने या मालिकेत नसतील.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ जाहीर

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने १८ ते २२ मार्चदरम्यान पुणे वाघोली येथे आयोजित ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचा संघ जाहीर करण्यात आला आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंना आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १५) शुभेच्छा दिल्या.

रायगड संघाच्या प्रशिक्षकपदी रोहिदास पाटील आणि व्यवस्थापक म्हणून दिलीप पाटील यांची निवड करण्यात आली. हा संघ रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे आधारस्तंभ आमदार प्रशांत ठाकूर आणि असोसिएशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या मंगळवारी (दि. १७) स्पर्धेसाठी रवाना होणार आहे.

या खेळाडूंना पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे सचिव पैलवान रूपेश पावशे, सहसचिव निलेश म्हात्रे, खजिनदार राजेश भोईर, राजाराम कुंभार आदी उपस्थित होते.

# क्रिकेट स्पर्धेत रावे संघ विजेता

**पाली : प्रतिनिधी**

पेण येथील सचिन तेंडुलकर स्टेडियमवर मनसे चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे विजेतेपद राजविर ११ भवानी फायटर रावे संघाने पटकावले.

स्पर्धेचे आयोजन निकिता पाटील, रूपेश पाटील आणि सहकार्‍यांनी केले होते. द्वितीय क्रमांक रमेश स्मृती महागणपती चिरनेर संघाने, शिवशंभो पाटणेश्वर तृतीय, तर चतुर्थ क्रमांक ग्रीष्म ११ मोठी जुई या संघांने प्राप्त केला. विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. सर्वोत्कृष्ट फलंदाज सुनील पाटील, सर्वोत्कृष्ट गोलंदाज दीक्षित पाटील, सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक साहिल वाघ या खेळाडूंनाही बक्षीस देऊन गौरविण्यात आले, तर लकी ड्रॉ उपक्रमात प्रेक्षकांसाठी खास स्कुटी भेट देण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभाला बेलदार भटका समाज (ओड) प्रदेशाध्यक्ष तथा भाजप नेते राजू साळुंके यांची उपस्थिती लाभली. त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



## ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# ग्रीफिन्स जिमखाना, श्री स्वामी समर्थ संघ अंतिम फेरीत

**ठाणे : प्रतिनिधी**

ग्रीफिन्स जिमखाना, श्री स्वामी समर्थ या संघांनी कुमार गटात ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी खासदार चषक कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. पुरुषांत मोरया मंडळाचा संघ चौथ्या फेरीत दाखल झाला आहे.



कळवा, खारेगाव येथील मैदानात सुरू असलेल्या कुमार गटाच्या उपांत्य सामन्यात ग्रीफिन्स जिमखाना संघाने ओम् कबड्डी संघाचा प्रतिकार २६-१४ असा मोडून काढत अंतिम फेरी गाठली. आदित्य पिलाणे, तन्मय पवार यांनी सुरवातीला आक्रमक खेळ करीत लोण देत पूर्वार्धात १५-०४ अशी भक्कम आघाडी घेतली. नंतर उत्तरार्धात सावध खेळ करीत आपला विजय साकारला. ओम् कबड्डीच्या यतेश भोपी, सिद्धेश साळुंखे यांनी उत्तरार्धात आपला खेळ गतिमान करीत ही आघाडी कमी करण्याचा उत्तम प्रयत्न केला, पण संघाला विजयी करण्यात ते अपयशी ठरले.

दुसर्‍या उपांत्य सामन्यात श्री स्वामी समर्थ मंडळाने डॉन बॉस्को स्पोर्ट्सला चुरशीच्या लढतीत ४२-४० असे चकवित अंतिम फेरीत धडक दिली. पहिल्या डावात दोन लोण देत स्वामी समर्थने २६-२० अशी आघाडी घेतली, पण एका लोणची परतफेड करीत डॉन बॉस्कोने ही आघाडी सीमित ठेवली. दुसर्‍या डावात सामना आणखी रंगदार अवस्थेत गेला. या डावात दोन्ही संघानी एका-एका लोणची नोंद केली. त्या डावात स्वामी समर्थने १६, तर डॉन बॉस्कोने २० गुणांची कमाई केली, पण पहिल्या डावातील आघाडीच्या बळावर स्वामी समर्थने दोन गुणांनी बाजी मारली. विवेक शिंदे, विशाल सिंग, विवेक चोरगे श्री स्वामी समर्थकडून, तर जीत सैनी, सूरज वायकर, ध्रुव लोखंडे डॉन बॉस्कोकडून उत्कृष्ट खेळले.

पुरुषांच्या प्रथम श्रेणीच्या तिसर्‍या फेरीत मोरया मंडळाने होतकरू मित्र मंडळावर २३-१४ अशी मात केली. विश्रांतीला ८-९ अशा पिछाडीवर पडलेल्या मोरयाने विश्रांतीनंतर टॉप गिअर टाकत लोण देत नऊ गुणांनी सामना आपल्या बाजूने झुकवला. परेश हरड, धीरज तरे यांच्या झंझावाती त्यांना मोहित भरवाढ याची मिळालेली पकडीची सुंदर साथ यामुळे मोरयाने हा विजय साकारला. होतकरूचा देवेन पाटील चमकला.

या अगोदर झालेल्या पुरुषांच्या दुसर्‍या फेरीच्या सामन्यात ग्रीफिन्स जिमने स्व. रतन पाटील संघाला ४५-१२ असे, अष्टविनायकने नंदकुमार क्रीडाला ३०-१० असे, डॉन बॉस्कोने भाऊ स्पोर्ट्सला ३२-२८ असे, श्री गणेश मंडळाने उत्कर्ष संघाला ३५-२५ असे, तर चिंतामणी स्पोर्ट्सने वेताळ मंडळाला ३८-२१ असे पराभूत करीत तिसरी फेरी गाठली.

# मुझाराबानीच्या आयपीएल एन्ट्रीमुळे पीसीबीचा जळफळाट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझाराबानी याने पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल)मधील आपला करार अर्धवट टाकून इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला (पीसीबी) मिरच्या झोंबल्या आहेत. ते मुझाराबानीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

केकेआरने मुस्तफिजुर रहमानच्या जागी ब्लेसिंग मुझाराबानीला संघात स्थान दिले आहे. बीसीसीआयच्या



सूचनेनंतर बांगलादेशच्या मुस्तफिजुरला संघातून मुक्त करण्यात आले होते. भेदक बाऊन्ससाठी ओळखल्या जाणार्‍या मुझाराबानीला गतविजेत्या 'केकेआर'ने आगामी हंगामासाठी आपल्या वेगवान गोलंदाजीची फळी मजबूत करण्यासाठी तातडीने स्वाक्षरी केली आहे.

मुझाराबानीच्या या निर्णयामुळे पीसीबीने थयथयाट सुरू केला आहे. पीएसएल हंगामासाठी मुझाराबानीला इस्लामाबाद युनायटेडने १.१ कोटी पाकिस्तानी रुपयांमध्ये आधीच करारबद्ध केले होते. 'जिओ सुपर'च्या रिपोर्टनुसार आयपीएलची ऑफर मिळाल्यानंतर झिम्बाब्वेच्या या गोलंदाजाने पीएसएल करारातून माघार घेतली.

पीसीबीच्या मते, हे कराराच्या अटींचे थेट उल्लंघन आहे. भविष्यात खेळाडूंनी अशा प्रकारे इतर लीगसाठी पीएसएल सोडल्यास लीगच्या प्रतिमेला धक्का लागू शकतो. हे रोखण्यासाठी बोर्ड आता कायदेशीर पावले उचलण्याचा विचार करत आहे.

### यापूर्वीही असे घडले होते

खेळाडूंवरून आयपीएल आणि पीएसएलमध्ये संघर्ष होण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या हंगामात, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कॉर्बिन बॉश यानेही असेच केले होते. पेशावर झल्मीने त्याला 'डायमंड पिक' म्हणून निवडले होते, मात्र नंतर तो मुंबई इंडियन्समध्ये 'इंज्युरी रिप्लेसमेंट' म्हणून सहभागी झाला. प्रचंड पैसा, जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहचण्याची संधी आणि जागतिक प्रसिद्धी यामुळे अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पीसीएलऐवजी आयपीएलमध्ये खेळण्याला प्राधान्य देतात.

# भारतीय महिला हॉकी संघ उपविजेता

## वर्ल्डकप पात्रता फेरीच्या फायनलमध्ये इंग्लंडकडून पराभव



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

हॉकी विश्वचषक पात्रता हॉकी स्पर्धेत भारतीय महिला संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम लढतीत इंग्लंडने भारतीय संघाचा २-० असा पराभव केला, मात्र भारतीय संघाने या वर्षी होणार्‍या विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता आधीच सिद्ध केली होती.

जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडला ग्रेस बाल्सडन हिने १३व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरद्वारे गोल करून आघाडीवर नेले. त्यानंतर ४३व्या मिनिटाला एलिझाबेथ नील हिने मैदानी गोल करत ही आघाडी दुप्पट केली. भारतीय संघाने पूर्ण ६० मिनिटे झुंज दिली, परंतु इंग्लंडचा भक्कम बचाव भेदण्यात त्यांना यश आले नाही. सुरुवातीच्या दहा मिनिटांच्या खेळात भारतीय महिलांनी इंग्लंड संघावर चांगला दबाव ठेवला होता, मात्र नंतर सूर गवसल्यावर इंग्लंडच्या खेळाडूंनी भारतीय महिला खेळाडूंना निष्प्रभ केले. या स्पर्धेतून इंग्लंडसह भारत आणि स्कॉटलंड यांनी विश्वचषकात प्रवेश मिळवला.

# इरफान पठाण म्हणतो, धोनीची ही शेवटची आयपीएल!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या २०२६ हंगामाकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले असतानाच महेंद्रसिंग धोनीच्या भवितव्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू इरफान पठाणच्या मते, हा धोनीचा शेवटचा हंगाम ठरू शकतो.

जिओ हॉटस्टारवरील चर्चे दरम्यान पठाण म्हणाला की, सीएसके आणि आयपीएल या दोन्हींसाठी धोनी अत्यंत महत्त्वाचा खेळाडू आहे. त्याच्या मते, धोनीशिवाय सीएसकेची कल्पना करणे कठीण आहे, पण कदाचित धोनीचा हा शेवटचा हंगाम असेल.

इरफानने असेही म्हटले की, धोनी मैदानावर किती सामने खेळणार हे स्पष्ट नसले तरी संघासाठी त्याची उपस्थिती



अत्यंत महत्त्वाची असेल. विशेषतः ड्रेसिंग रूममध्ये त्याच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा फायदा तरुण खेळाडूंना होईल.

सीएसकेच्या संघात नव्याने आलेल्या संजू सॅमसनबाबत पठाण म्हणाला की, सॅमसनलाही या संघातून नेतृत्वाचे धडे मिळतील. सध्या ऋतुराज गायकवाड हा संघाचा कर्णधार असला तरी भविष्यासाठी दोन-तीन खेळाडूंना नेतृत्वासाठी तयार केले जात आहे. या प्रक्रियेत धोनीची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

### ...तर माहीला संस्मरणीय निरोप

चेन्नई सुपर किंग्ज संघ व्यवस्थापन तरुण खेळाडूंना खूप आत्मविश्वासाने तयार करत आहे. स्टीफन फ्लेमिंग प्रशिक्षक आणि अनुभवी खेळाडूंचे मार्गदर्शन यामुळे संघात सकारात्मक वातावरण तयार होत आहे. आता आयपीएल २०२६ हंगामात सीएसकेचा मुख्य उद्देश सहावे विजेतेपद जिंकण्याचा असेल. जर संघाने हा किताब जिंकला, तर माही अर्थात धोनीसाठी तो एक संस्मरणीय निरोप ठरू शकतो. त्यामुळे या हंगामाकडे चाहत्यांसह क्रिकेटविश्वाचेही विशेष लक्ष लागले आहे.

# पीसीबी खेळाडूंसाठी कडक धोरण आखणार

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली पार पडलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानची कामगिरी निराशाजनक राहिली. पाकिस्तानचा संघ सुपर-८ टप्प्यातूनच बाहेर पडला. या पराभवानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) प्रवक्ते आमिर मीर यांनी बोर्डाची भूमिका स्पष्ट केली आहे.

नुकत्याच संपलेल्या टी-२० विश्वचषकात पाकिस्तानचा संघ उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यात अपयशी ठरला. यानंतर खेळाडूंवर दंडात्मक कारवाईच्या चर्चांना उधाण आले होते, परंतु पीसीबी प्रवक्ते आमिर मीर यांनी यांनी हा दावे फेटाळून लावत सांगितले की, कोणत्याही खेळाडूवर अद्याप दंड आकारण्यात आलेला नाही, मात्र बोर्ड खेळाडूंसाठी एक नवीन रणनीती तयार करण्यावर विचार करत आहे, कारण चांगली कामगिरी केल्यावर खेळाडूंना मोठे प्रोत्साहन (इन्सेंटिव्ह) मिळते.

मीर यांनी पुढे म्हटले की, आता प्रत्येक खेळाडू वर्षाला सुमारे सहा ते सात कोटी रुपये कमावतो. त्यामुळे त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना जबाबदार धरण्याबाबत बोर्ड गांभीर्याने विचार करत आहे.

२०२३चा वनडे विश्वचषक, २०२४चा टी-२० विश्वचषक आणि २०२५ची चॅम्पियन्स ट्रॉफी यानंतर पाकिस्तान सलग चौथ्या आयसीसी स्पर्धेच्या बाद फेरीत पोहचण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे पाकिस्तानी चाहत्यांमध्ये प्रचंड निराशेचे वातावरण आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com